## प्रकरण तिसरे

'चित्रपट, मी व मला दिसलेले जग' या

आत्मकथानकाचे अंतरंग

## ::*:: प्र क र ण ति स रे ::*::

## ** "चित्रपट, मी व मला दिसलेले जग" या आत्मकथनाचे अंतरंग **

"चित्रपट - मी व मला दिसलेले जग" हे आत्मचरित्र कै. प्रा. श्रीपाद महादेव उर्फ बापूसाहेब माटे यांनी आपल्या एकाहत्तराव्या वाढदिवशी लिहून पूर्ण केले. "चित्रपट" हे या ग्रंथाचे शीर्षक आहे. "मी व मला दिसलेले जग" असे उपशीर्षक आहे. माट्यांनी हा ग्रंथ इ.स. १९५७ साली लिहिला.

माट्यांनी आपल्या आत्मचरित्राची रचना अत्यंत जाणीवपूर्वक केलेली आढळते. वास्तविक ही आत्मचरित्रात्मक लेखमाला सुरूवातीस "वसंत" मासिकातून प्रसिध्द होत असे. माट्यांनी श्री.स.कृ. पाध्ये यांना याविषयी सांगितले. व त्यांनी ते लगेच मान्य करून ही लेखमाला ग्रंथरूपाने प्रकाशित केली. विस्तारभयास्तव काही भाग वगळला.

श्री.माटे यांच्यासारखा समाजमनस्क वृत्तीचा लेखक आणि विचारवंत जेव्हा आत्मचरित्र लिहितो. तेव्हा केवळ आपल्याविषयी सांगत रहावे असे त्याला वाटत नाही. आत्मकथनात सामाजिक जीवन, राजकीय स्थिती आणि गती, शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरण आणि एकंदर आपल्या काळातील लोकजीवनाचा इतिहास याचे लेखन करायचे हा माट्यांचा मुख्य हेतू होता. काही व्यक्तींची आत्मचरित्रे फक्त त्यांच्या स्वत:वरच प्रकाशाचा झोत टाकतात. आजूबाजूच्या घटना, व्यक्ती आणि समाज यांच्याविषयी अशी आत्मकेंद्रित आत्मचरित्रे उदासीन असतात. पण माटे हे समाजद्रष्टी

असलेले आणि आजूबाजूच्या जगाचे बारकाईने निरीक्षण करणारे जाणीवसंपन्न साहित्यिक व शिक्षक असल्यामुळे माट्यांचे आत्मचरित्र हे माटे - कालीन सामाजिक जीवनाचे इतिहासदर्शनही बनले आहे.

श्री. माटे यांचे आत्मचरित्र हे जितके माटे या व्यक्तीचे आहे. त्यापेक्षाही ते त्यांच्या काळातील समाजीवनाचे चरित्र आहे. याचे कारण लेखकाची मानसिक प्रकृतीच मुख्यत: "सामाजिक" होती. आपल्या व्यक्तिगत सुखदु:खाच्या वर्तुळात केवळ रममाण व्हावे आणि सभोवतालच्या समाजातल्या समस्यांकडे पाठ फिरवावी असा पिंड काही लेखकांचा- कलावंतांचा असतो. ते स्वत:मध्येच अडकून पडलेले असतात. त्यांचे जग मर्यादित असते. त्यामुळे आपल्या सभोवताली पसरलेल्या विराट जगताची त्यांना कल्पनाच येत नाही. वस्तुत: कोणताही लेखक किंवा कवी समाजजीवनातूनच आपल्या पोषणाची द्रव्ये [ Vitamins ] मिळवीत असतो. समाजाचे एक व्यापक ऋण त्याच्यावर असते. पण कित्येक लेखकांना ही व्यापक जाणीव होत नाही. ते आपल्या विशिष्ट आयुष्याच्या आकुंचित प्रदेशात संतुष्ट मनाने विहार करीत राहतात. याचाच अर्थ अशा व्यक्तींच्या अनुभव-कक्षा अगदीच अरुंद असतात. व्यष्टीतून समष्टीकडे जाण्यासाठी आवश्यक असलेला दृष्टीचा विकास झालेला नसेल तर आत्मकथन हे आत्मकेंद्रीत मनाचे सामान्य दर्शन ठरते. मराठी साहित्यात अशी काही आत्मचरित्रे आहेत, की त्या आत्मवृत्तातून समाजमनाची स्पंदने कळू शकतात. अशी आत्मवृत्ते वाचकांना नव्या जाणीवा देत राहतात. म.गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांची आत्मचरित्रे मराठीत अनुवादित झाली आहेत. ही पुस्तके वाचताना गांधी, नेहरूंच्या व्यापक जीवनदृष्टीची आणि विस्तृत अशा लोकानुभवाची

साक्ष पटते. त्यांच्या तुलनेत श्रीपाद महादेव माटे हे व्यक्तिमत्व लहान वाटले तरी ते विकसित झालेले आहे. आणि आपल्या देशाच्या समस्यांचा सुखादु:खाचा विचार करण्याइतके प्रगल्भ आणि व्यापक बनले आहे याची जाणीव होते. हे अशा लेखकाचे आत्मकथन आहे की, ज्यात केवळ एका साहित्यिकाचीच जीवनकथा नाही, तर एका ध्येयवादी शिक्षकाची, समाजसुधारकाची आणि तत्वजिज्ञासू चिंतकाची कहाणी आहे. देशावरील आपत्तीमुळे दु:खी झालेल्या सुजाण नागरिकाची आणि देशभक्ताचीही ती कथा आहे. माटे हे समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांचे जवळून निरीक्षण करणारे जागरुक अभ्यासक होते. ते केवळ कलावंत नव्हते. याचा परिणाम आत्मकथनाने व्हावा आणि हे आत्मकथन एखादया चित्रपटासारखे विविध परिणाम लाभलेले असावे यात आश्चर्य वाटत नाही. माटे हे नाव उच्चारल्याबरोबर त्यांचे अनेक पदरी व्यक्तिमत्त्व दृष्टीसमोर उभे राहते. विज्ञानाकडे अभिमुख होऊन "विज्ञानबोधाची प्रस्तावना" लिहिणारे वैज्ञानिक प्रवृत्तीचे माटे, ग्रामीण भागातल्या सामान्य माणसाशीही कसे समरस होत होते याचेही दर्शन यात घडते. म्हणूनच "मी व मला दिसलेले जग" याचे वर्णन करताना यातला "मी" लहान राहिला असून त्या "मी" ला दिसलेले जग केवढे संमिश्र, बहुपेडी आणि विविध समस्यांनी भरलेले आहे याचेही भान वाचकाला येते.

माटयांचे सगळे आयुष्य भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीच्या कालखंडातच गेले असल्याने त्यांच्या आत्मचरित्रात सर्वत्र राजकीय-सामाजिक परिस्थितीचेच दर्शन जास्त घडणे स्वाभाविक होते. महाराष्ट्रातील जवळजवळ १८९५-१९५५ या साठ वर्षाच्या काळातल्या राजकीय इतिहासाचे दर्शन आपणास यातून घडते. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या दोन युगांचे, त्यांच्या समर्थ नेतृत्वाचे

मार्मिक दर्शन यात आलेले आहे. तो काळच इतका प्रभावशाली होता की, कित्येक व्यक्ती या राजकीय प्रवाहात नकळत सामील होत असत. माट्यांनी तर टिळक, गांधी, नेहरू यांच्या भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास प्रत्यक्ष पाहिला - अनुभवला. या संदर्भात ते म्हणतात,

"एकोणिसशे पांच सालच्या शेवटी शेवटी मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेनंतर टिळकांचे भाषण गायकवाड वाड्यांत ऐकण्याचा पहिला योग मला आला. तेव्हापासून पुढे मी पुण्यासच रहात आलो; आणि त्यांची पुढली सारी धीरोदात्त आणि भव्य कारकीर्द मला स्वच्छपणे पाहतां आली. ह्या गोष्टीचा मला आनंद होतो की, ऐन तारुण्यात ह्या दिग्विजयी पुरुषाचे चरित्र आम्हाला पाहता आले. आम्ही भाग्यवान की ह्या पुरुषाच्या मागोमाग महात्मा गांधीचे वैभवशाली दर्शन आम्हाला झाले; आणि ते भाग्य अजूनही चालू आहे की, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सारखा सुविचारसंपन्न नेता भारतावर वैचारिक अधिराज्य चालवीत आहे".१/

यादृष्टीने माट्यांनी आपल्या आत्मचरित्रात त्या काळातील राजकीय घडामोडींचे वास्तव दर्शन घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांनी आपल्या आत्मचरित्राला दिलेल्या शीर्षकावरूनच असे जाणवते की, त्यांना "स्व" चित्रणापेक्षा जगाचेच चित्रण अधिकांशाने स्पष्ट करावयाचे होते. यावरून त्यांनी दिलेल्या शीर्षकाची समर्पकता आपणांस पटते.

कुठल्याही वाङ्मयीन कलाकृतीमधून समाजाचे चित्रण अपरिहार्यपणे घडतेच. कारण कुठलाही लेखक हा समाजापासून अलिप्त राहून लेखन करू शकत नाही. त्यातल्या त्यात आत्मचरित्र-

काराला तर ते शक्य नसते. साहित्यिक हा "स्व" जीवनाच्या चित्रणाबरोबरच तत्कालीन परिस्थितीचेही दर्शन आपल्या साहित्य-कृतीतून कळत-नकळत घडवीत असतो. तेन ने म्हटलेच आहे की, Man is the product of environment व ते बरोबरही आहे. कथा कादंबरीप्रमाणे ह्र वाङ्मयप्रकार स्थलकाल-व्यक्तिनिरपेक्ष असू शकत नाही. वि.वा.शिरवाडकरांनी या संदर्भात काढलेले उद्गार महत्वाचे आहेत. ते म्हणतात,

"जीवनाच्या ज्या परिसरात आपण वावरतो, त्यापासून साहित्य हे अलग काढता येईल, हे शक्य नाही. साहित्यिकाची प्रतिभा कितीही आकाशगामी असली तरी त्याचे पाय नव्हे, त्याचं सारंच जीवन पृथ्वीवर टेकलेलं असतं. लेखकांच व्यक्तित्व हे त्याच्या वाङ्मयाचं अधिष्ठान असतं हे कोणीच नाकारत नाही. परंतु हे व्यक्तित्वसुध्दा सामान्यत: मानलं जात तितकं स्वयंभू आणि स्वतंत्र असत नाही. परिसरातील परिस्थितीचे नानाविध संस्कार त्याच्यावर होत असतात व त्या क्रिया प्रतिक्रियांतून त्याला विशिष्ट आकार, विशिष्ट रंग प्राप्त होतो."[२] हे विधान सर्व वाङ्मयाला लागू पडणारे आहे. परंतु केवळ समाजदर्शन, घडविण्याच्याच हेतूने आत्मचरित्र लिहिले जाऊ नये. ते फारसे सरस उतरत नाही. समाजदर्शन हे नाहीतरी आत्मचरित्रात प्रसंगानुसार-ओघाओघाने येतेच.

## आत्मचरित्राची रचना व त्याचे अंतरंग :

माटयांनी आपल्या आत्मचरित्राची रचना तत्कालीन जगाची म्हणजे राजकीय-सामाजिक परिस्थितीची कल्पना यावी याच उद्देशाने केलेली दिसून येते. त्यांच्या आत्मचरित्रात एकूण सव्वीस प्रकरणे आहेत. या विविध प्रकरणांतून त्यांनी प्रसंगानुसार सामाजिक, राजकीय व

कौटुंबिक परिस्थितीचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. या व्यतिरिक्त काही ठिकाणी प्रादेशिक वर्णने व व्यक्तिचित्रणेही जागोजागी आलेली आहेत. माट्यांनी आपल्या आत्मचरित्रातील प्रकरणांना "चित्र पहिले", "चित्र दुसरे" असे नाव दिलेले आहे.

पहिल्या प्रकरणांत जन्म, बालपण, आजोळ घरची आर्थिक परिस्थिती यांचे चित्रण आलेले आहे. याच प्रकरणात म्हणजे दुस-या टप्प्यात शाळा व त्यांना शिकवावयास असलेल्या मास्तरांची काही व्यक्तिचित्रणे आली आहेत. ती मोठी उद्बोधक व मनोरंजक आहेत. यानंतर एक दोन प्रादेशिक चित्रांची वर्णने आली आहेत. पुढील परिच्छेदात काही सामाजिक आपत्त्यांचा उल्लेख आलेला आहे. उदा. प्लेग व पटकी. नंतर तत्कालीन परिस्थितीच्या चित्रणात इंग्रजांचा उद्योग, समाजातील धंदे, नव्या माणसाचा उदय, पांढरपेशातील चलबिचल, समाजातील चालीरीती, समाजातील एकमेकांना मदत करण्याची प्रवृत्ती, सामाजिक व्यग्रता, तालमीचे आखाडे, शाळेतील अभ्यासक्रम, स्वत:च्या अभ्यासाची तयारी इ.ची माहिती यात आली आहे.

माट्यांचा जन्म व-हाडातील शिरपूर गावी १८८६ साली भाद्रपद शुध्द द्वितीयेस सकाळी आठच्या सुमारास झाला. माट्यांचे घराणे सुसंस्कृत व विद्यासंपन्न होते. त्यांचे वडील महादेवशास्त्री कोकणात शिक्षक होते. काही कारणास्तव नोकरीच्या निमित्ताने ते व-हाडात आले. व-हाडांत अमरावती, अकोला, शेवगाव, शिरपूर इ. ठिकाणी त्यांनी नोकरी केली. माट्यांना वडिलांचे छत्र फार काळ लाभले नाही. माटे एक वर्षाचे असतानाच ते वारले. सगळ्या कुटुंबाचा भार त्यांच्या आईवर पडला. पोटी पाच मुले घेऊन त्या माऊलीने अत्यंत धीराने आपल्या प्रपंचाचा डोलारा सांभाळला. मोठी मुले मात्र

त्यांच्यापासून दुरावली. शिक्षणासाठी त्यांना परगावी रहावे लागले. तेही माधुकरी वृत्तीने. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांचे बालपण गेले. इतरांच्या मदतीने, नातेवाईकांच्या सहाय्याने, कधी कधी अर्धपोटी राहून त्यांना आपले शिक्षण पूर्ण करावे लागले. ह्या प्रसंगी माट्यांच्या आईने असामान्य धैर्याने आपला प्रपंच सांभाळला. घरगुती अडचणी व आर्थिक बाजू कमकुवत असल्या कारणाने माट्यांचे शिक्षण थोडे सावकाश झाले. या वरील कारणांमुळेच त्यांना "न्यू इंग्लिश स्कूल" मध्ये नोकरी करावी लागली. नोकरी करत असतानाच अत्यंत चिकाटीने अभ्यास करून माट्यांनी मराठी व इंग्रजी या दोन्ही विषयात एम.ए.ची पदवी मिळविली. सुरुवातीस शिक्षक व नंतर प्रोफेसर म्हणून ते सेवानिवृत्त झाले. माट्यांनी शेवटपर्यंत अध्यापनाचे काम केले. प्रथम ते "न्यू इंग्लिश स्कूल", "नू.म.विद्यालय", नंतर "स.प.महाविद्यालय" अशा वेगवेगळ्या शाळा, महाविद्यालयांमधून त्यांनी अध्यापनाचे काम केले.

त्यांचा बालपणाचा काळ साधारणपणे टिळकांच्या राजकीय संग्रामाचा होता. माट्यांच्या जन्माच्या पुढेमागेच अव्वल इंग्रजीचा कालखंड संपून भारतीय जीवनात सर्वच क्षेत्रात नव्या उलाढाली चालू होत्या. या काळात महाराष्ट्रात प्रचंड विचारमंथन झाले. माटे स्वत: आपल्या जन्माच्या वेळची परिस्थिती "नव्या माणसांचा उदय" या परिच्छेदात सांगतात.

"मला नकळत, माझ्या जन्मापासूनच्या या काळात केवढयातरी गोष्टी घडलेल्या होत्या! लोकहितवादी म्हणजे गोपाळ हरी देशमुख हे मरण पावले होते. ज्योतिबा फुले हेहि दिवंगत झालेले होते. या सुधारकांच्या जीवित हेतुंचा आणि आग्रहांचा वाङ्मयाने साप्ताहिक पुरस्कार करणारे आगरकर, आपले काम अर्धवट टाकून

इहलोक सोडून गेलेले होते. तसेच माझ्या जन्माच्याहि आधी सहा वर्षे विष्णुशास्त्री चिपळूणकर अपमृत्यूची झडप पडून निघून गेले होते. "डेक्कन एज्युकेशन सोसायटी" या संस्थेची स्थापना झालेली होती; आणि कॉंग्रेस या संस्थेने मूळ धरलेले होते. विचारवंतांचे अग्रणी न्यायमूर्ति रानडे यांच्या उदात्त विचारांच्या छायेत सुशिक्षित समाज विसावा पावत बसलेला होता; आणि वासुदेव बळवंतांचे छोटे क्रांतियुध्द लयाला जाऊन महाराष्ट्रातील लोक पुन्हा एकदा हताश बनले होते. विष्णुशास्त्र्यांपासून स्फूर्ति घेतलेले राजवाडे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, शिवरामपंत परांजपे, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, हरिभाऊ आपटे इत्यादी हळूहळू कर्तृत्वाच्या उमेदीत प्रविष्ठ होत होते; आणि डॉ. धोंडो केशव कर्वे यांची स्त्रीजातीची सेवा साकार बनू लागली होती. पण सर्वांच्या वर म्हणजे इंग्रज सरकारच्या सार्वभौम सत्तेलासुध्दा दरडावून आव्हान देणारे बाळ गंगाधर टिळक हे लोकांचे दैवत बनू लागले होते."[3] एकंदरीत अत्यंत संवेदनक्षम प्रभावी वातावरणात माटयांचे बालपण गेले.

यानंतर या दरम्यान इंग्रजांच्या राजवटीमुळे सा-या समाज-जीवनात कसा बदल घडत गेला व इंग्रजांनी आपले महत्व पटवून देण्यासाठी ठिकठिकाणी लहान-मोठे उदयोग-धंदे कसे सुरू केले. याची सविस्तर माहिती माटयांनी दिली आहे.

पुढे सामाजिक व्यग्रता या परिच्छेदात समाजातील स्त्रीविषयक धोरण कसे होते हे सांगताना माटे म्हणतात. "स्त्री-शिक्षण हा जवळजवळ थट्टेचा विषय होता, आणि बालविधवांच्या पुनर्विवाहाला सुध्दा संमति देणारे पांढरपेशा समाजातहि फार थोडे लोक सापडत."[4] हे सांगत असतानाच माटयांनी काही सामाजिक अवस्थांचे दर्शन घडविले आहे. उदा. अन्नधान्याची स्वस्ताई, समाजातील सामरस्य.
या समाजातील सामरस्याविषयी माटे लिहितात, -

"आपल्या समृध्दीतील थोडा थोडा वाटा चार चौघांच्या घरी आपण होऊन पोचता करावा अशी खानदानीची वहिवाटच असे. शेतावर ऊंस पिकला, वांगी झांडीवारी आली, किंवा आंब्याच्या आढया घरोघरीच आढयाला लागल्या, तर जसे शेजा-या-पाजा-यांना, गरीब नातेवाईकांना, तसेच अधिका-यांनासुध्दा यांतले थोडे थोडे पोचवावे हा एक शिष्टाचार समजत असत; आणि त्यामुळे एकंदर लोकांत विशेष प्रकारचे सामरस्य असे."[५] समाजात अलीकडे ही वृत्ती नष्ट होत चाललेली आपणांस दिसून येते.

यानंतर माटे त्यावेळच्या अध्यापनाविषयी सांगतात, "अध्यापन हे एक धर्मकृत्य आहे, हा धांदा नव्हे, ही दृष्टी समाजात अजूनही कायम होती; त्यामुळे कपर्दिकेचीही वासना न ठेवता, शिक्षक कसून मेहनत करीत."[६] पुढे शुध्दलेखनाबद्दल म्हणतात, "शुध्दलेखनाचे नियम तर इतके कडक असत की ते जर आता लागू केले, तर कांही कांही चांगल्या चांगल्या लेखकांची तिरपिट उडेल."[७] आत्ताच्या अध्यापना-विषयी शिक्षकांविषयी न लिहिलेलेच बरे.

याच प्रकरणात व पुढे चवथ्या प्रकरणांत काही प्रादेशिक चित्रांची वर्णने आली आहेत. उदा. शिखर शिंगणापूर, मालोजी राजांचा तलाव, आजूबाजूच्या परिसरातील काही गावे - बोंबलदरा, जुना सातारा, जुने पुणे, साता-याच्या आसपास असलेले उंच उंच डोंगर - सरंड्याचा डोंगर, मेरुलिंगाचा डोंगर, यवतेश्वराचा डोंगर, परळीचा किल्ला, सज्जनगड, अजिमतारा किल्ला इत्यादींच्या वर्णनामुळे ही स्थळे आपण प्रत्यक्ष पहात आहोत की काय असा भास होतो इतकी ती जिवंत उतरली आहे. याचे एक उदाहरण द्यायचे झाल्यास

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"मालोजी राजांच्या तलावाच्या इतिहासाचे देता येईल. ते असे.

"तेथल्या त्या प्रचंड तलावाच्या भोवती मालोजी राजांनी बांधलेली ताल म्हणजे भिंत - अशी भक्कम आहे की, अजून तिचा एकहि पाषाण ढळलेला नसेल. हस्ताचा पाऊस सुरू झाला, म्हणजे टेकडीवरून वहात येणारे डोंगरातील पाणी, तालीत मुद्दाम ठेवलेल्या कमानीतून तलावांत जमा होई; आणि थोड्याच दिवसांत हा तलाव एखादया भव्य सरोवराप्रमाणे जलमय झालेला दिसे. तलावांत लांब पलीकडे एक लहानसा उंचवटा आहे; आणि त्याच्याहि पलीकडे पुन्हा तलावच आहे."[८] याचा इतिहासही माटयांनी खूपच मनोरंजक सांगितला आहे. "त्या उंचवटयावर हसन आणि हुसेन यांची कुस्ती लागली; हसन या अंगाला पडला; अर्थात या अंगाला एक तळे झाले आणि त्या अंगाला एक तळे झाले."[९] अशी प्रादेशिक वर्णने जागोजागी आढळतात.

दुसऱ्या प्रकरणांत त्यांचे शालेय जीवन, व पुन्हा काही मास्तरांची व्यक्तिचित्रणे, स्वत:च्या नावाचा इतिहास, त्यांची अभ्यासातील प्रगती, आईचा सोशिकपणा, काही प्रतिकूल परिस्थितीच्या घटना, गावकऱ्यांची मदत, मोठया भावाचा उदारपणा, यानंतर स्वत:बद्दलची थोडी माहिती दिली आहे. यातील एक, दोन परिच्छेदांचा ऊहापोह.

माटे वऱ्हाडांत श्रीपूर येथे जन्मलेले असल्याने त्यांचे नांव "श्रीपति" असे ठेवण्यात आले होते; शिंगणापूरच्या शाळेत ते तसेच लागलेले होते. पण पुढे विदयास रहावयास आल्यानंतर तेथील शाळा मास्तरांनी त्यांचे नाव बदलले. श्रीपतिचे श्रीपाद असे रूपांतर त्यांनी केले.

माटे वर्गात एक हुषार विद्यार्थी म्हणून गणले जात. त्यांचा गणित विषय थोडासा कच्चा होता. पण बाकीचे इतर विषय मात्र अत्यंत चांगले होते. त्यांच्या हुषारीबद्दल बापुराया मास्तरांना भलताच अभिमान वाटे. ते माट्यांना सहाव्या इयत्तेच्या मुलांत नेऊन उभा करीत व ग्रंथावरून व्याकरण चालविण्यास सांगत. माटेही त्यांच्याशी स्पर्धा करून सतत पहिला नंबर मिळवित असत.

यानंतर पुढे प्रतिकूल प्रसंगाशी टक्कर देत सगळ्या भावंडांना शिक्षण द्यावे लागले, हया प्रसंगी त्यांच्या वडील बंधूनी खूपच समंजसपणाने व उदारवृत्तीने घरच्यांना सांभाळले. या भावाच्या स्वभावाबद्दल माटे म्हणतात,

"दादा फार थोर मनाचा होता. पगार थोडा खरा, आणि आमच्याबरोबर त्याचे हालहि होत असत; पण भावांना घालवून देऊन आपण मोकळे व्हावे, ही कल्पना त्यांच्या मनांत कधीही आली नाही. दादा व बाई या दोघांनी प्रतिकूल प्रसंगातून प्रपंच मोठ्या शर्थीने निभावून नेला."[१०]

या प्रकरणातील आणखी एक उदाहरण सांगितले पाहिजे, कारण यातून माट्यांची चौकस बुध्दी दिसून येते. वर्गात शिकवीत असताना काही मास्तर लोकांना पेंगण्याची सवय असते. माटे या संदर्भात म्हणतात,

"वर्गात झोप घेण्याचा हा सार्वत्रिक रोग थोडासा चर्चेचा विषय बनू शकतो."[११] पुढे या गोष्टीचे समर्थन करताना म्हणतात, "तेंव्हा शाळा जास्त वेळ व सकाळी खूप लवकर भरवित

असत, सकाळी सुरू झालेले शाळेचे काम थेट सूर्य मावळेपर्यंत चाले. बहुतेक सगळा दिवस विद्यार्थी व मास्तर शाळेतच असत. अर्थात इतके तांगडून पडल्यानंतर उन्हाच्या वेळेला झोप येणे, हे अगदी स्वाभाविक होते."[१२] असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. यावरून माटे कुठल्याही विषयाचा अभ्यास करताना त्याच्या मुळाशी जात असत. या लहान वयातही त्यांची विचक्षण बुध्दी बरेच काही टिपून घेई.

तिसऱ्या प्रकरणात - जुना सातारा शहराचे वर्णन व तेथील विविध क्षेत्रांतील नामवंत कार्यकर्त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची माहिती आली आहे. यानंतर "न्यू इंग्लिश स्कूल" या शाळेविषयी, शिक्षणाच्या नव्या तंत्राविषयी व प्रार्थना समाजाच्या कार्याविषयी माहिती दिली आहे. याही प्रकरणात पुन्हा काही मास्तरांचे व्यक्तिचित्रण आलेले आहे. या व्यतिरिक्त शिवाजी महाराजांच्या कुळातील आबासाहेब भोसले यांचेही शब्दचित्र माट्यांनी मोठ्या श्रध्देने रेखाटले आहे. माट्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रणांची एक दोन उदाहरणे.

१] कष्टी राजा - आबासाहेब भोसले :

"शिवाजी महाराजांच्या कुळांतील या पुरुषाचा रुबाब खरोखर अलौकिक होता. निराश होऊन एकांतात जीवन कंठणारी महाराष्ट्रात ठिकठिकाणी जी अनेक माणसे होती, त्यांत आबासाहेब महाराज हे प्रमुख समजले पाहिजेत. त्यांचे सर्वस्व गेले होते. आबासाहेबांना इंग्रजांनी कांहीही उरू दिले नव्हते; आबासाहेबांना या गोष्टीचा अवमान वाटे. महाराजांचा जबडा एखादया सिंहासारखा

होता; आणि त्यांचे शारीरसामर्थ्य मी मी म्हणणाऱ्या पहिलवानांना जरबेत ठेवील, असे होते. महाराजांना पहिलवानीचा शोक होता. लोक अतिशयोक्तीने सांगत असत की, धोतराचा पिळा पिळावा, तसे आबासाहेब महाराज लोखंडाची पहार पिळत असत."[१३]

## २] फॅशनेबल मास्तर :

"आमच्या सगळ्या शिक्षकवृंदांत अतिशय झकमक वागणारे आमचे ड्रॉइंगचे शिक्षक होते. हे ड्रॉइंगचे सर नुसते फॅशनेबल नव्हे; तर मोठे नटमोगरे गृहस्थ होते. डोक्यावर जांभळ्या रंगाची दिसणारी एक खुतनीची टोपी ते घालीत. सबंध शाळेत केवळ दाढी करणारे एवढेच गृहस्थ होते. डोक्यावरील केसांची निगाही ते फार चांगले राखीत. गळ्याला कडकडीत कॉलर, अंगात पांढरा स्वच्छ खमीस वर काळे जाकीट, त्याच्यावर सुरेखशा विलायती कापडाचा कोट, पांढरे स्वच्छ धोतर, खाली पायमोजे आणि बूट, हातांत थेट पुस्तकाच्या आकाराची दिसणारी एक ड्राइंगच्या सामानाची पेटी असा या ड्रॉइंगच्या मास्तरांचा थाट असे."[१४]

## ३] अच्युतराव :

"अच्युतरावांसारखा राक्षसी आवाज असलेला शिक्षक बोलू लागला म्हणजे या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्व शाळा दुमदुमून जात असे; आणि बोलण्याच्या ओघात हास्यरसाचे अनेक प्रसंग येत असल्यामुळे एकदा त्यांचे ते मजेदार हास्य सुरू झाले, म्हणजे भोवतालच्या पडद्या आणि डोक्यावरचे पांझरण हालत आहेत की काय असे आम्हा विद्यार्थ्यांना वाटत असे."[१५]

अशी व्यक्तिचित्रणे काही प्रकरणे वगळता जवळजवळ सगळ्या प्रकरणात आढळतात. यात प्रत्येक क्षेत्रातल्या नामवंत व्यक्ती आहेत. कॉलेजातील प्रोफेसर्स आहेत. उदा. रँग्लर परांजपे,वासुदेवराव पटवर्धन. पुन्हा राजकारणांतील व्यक्ती आहेत. उदा.लो.टिळक, म.गांधी, गोखले, परांजपे वगैरे. याशिवाय नाट्यक्षेत्रातील व्यक्तींचीही चित्रणे एक दोन प्रकरणांतून आली आहेत. त्यात नानबा गोखले, हल्याळकर, गणपतराव जोशी, खाडिलकर, बालगंधर्व, बोडस इ.चा समावेश होतो.

पुढील टप्प्यात नारायणबुवा फलटणकर, माहुलकर बुवा, मधुरकर बुवा इ.कीर्तनकारांची व्यक्तिचित्रणे आली आहेत. आपल्या आईचे व भावाचे देखील शब्दचित्र माट्यांनी मोठ्या श्रध्देने रेखाटली आहेत. पुढे "अस्पृश्यता निवारण" मंडळातील सहाय्यक मंडळींची देखील व्यक्तिचित्रणे माट्यांनी प्रसंगानुसार रेखाटली आहेत. यात लक्ष्मण बळवंत भोपटकर, हरि गणेश फाटक, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे इ.व्यक्तींचा समावेश होतो. ही सगळीच चित्रणे मोठी मजेदार व उत्कृष्ठ उतरली आहेत. माट्यांच्या आत्मचरित्रात सगळीकडे व्यक्तिचित्रणांची नुसती रेलचेल उडालेली दिसून येते.

चवथ्या प्रकरणांत - माटे साताराच्या शाळेत असताना तिथे काही नामवंत व्यक्तींनी प्रसंगानिमित्ताने सातान्यास भेट दिली होती. त्यात पार्वतीबाई आठवले [समाजकार्यकर्त्या], रँग्लर परांजपे, नामदार गोखले, हंसस्वरूप स्वामी, पं.भांडारकर ह्या सगळ्या व्यक्तींबद्दल थोडी थोडी माहिती माट्यांनी दिली आहे. यानंतरच्या एका परिच्छेदात स्वत:ची वैयक्तिक माहिती सांगताना एका प्रसंगात त्यांच्या

स्वभावातील एक दोष मोकळेपणाने सांगितलेला आहे. ह्या दोषाचा उल्लेख दुसऱ्या प्रकरणात आलेला आहे. त्यामुळे त्याचा उल्लेख येथे करीत नाही. पुढे स्वत:ला असलेल्या नाटकाच्या आवडीबाबत थोडी चर्चा केली आहे. नंतरच्या परिच्छेदात माट्यांना कॉलेजचे शिक्षण दयायचे असे घरातील सगळ्या मंडळींनी कसे ठरविले हे सांगितले आहे. या प्रकरणात विशेष काही नसले तरी एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. यातील एका परिच्छेदात माट्यांनी स्वत:स निर्माण झालेल्या कथावाङ्‌मयाच्या प्रेरणेचा उल्लेख केला आहे. कथा-वाङ्‌मयाची प्रेरणा लहानपणाच्या संस्कारातून मिळाली; असे माट्यांनी सांगितले आहे. या संदर्भात ते म्हणतात,

"वडीलबंधू पोलीस खात्यात असल्याने आमच्या घरी नेहमी या खात्यांतील गोष्टी कानावर येत. अमुक दरोडा, तमुक दरोडा, याची साक्ष, त्याची साक्ष असले प्रकार कानावर नेहमी येत. मांग, रामोशी, उचले यांच्या साहसाच्या नवलकथा मी याच काळांत ऐकल्या. पिऱ्या मांग हा मी स्वत: पाहिलेला होता. उंच उंच काठया हातांत घेतलेले धिप्पाड रामोशी आमच्याकडे पुष्कळदा येत. या सर्व संस्काराची छाप माझ्या कथा वाङ्‌मयावर जिकडे तिकडे पडलेली दिसेल."[१६]

यानंतर त्यांनी जुन्या पुण्याचे वर्णन केले आहे. या वर्णना-वरून तत्कालीन परिस्थितीची कल्पना येते.

पाचव्या व सहाव्या प्रकरणांत कॉलेज जीवन, व त्यांना शिकवावयास असलेल्या काही प्राध्यापकांची व्यक्तिचित्रे व त्यांची शिकविण्याची पध्दती इ. संबंधाने चर्चा केली आहे.

माट्यांनी या प्राध्यापकांचा मोठा गौरव केलेला असला तरी या संदर्भात ते म्हणतात, "आमच्या प्राध्यापकांच्या संबंधाने आम्हाला आदरभाव वाटावा हे स्वाभाविक होते. त्यांच्यातले जे कोणी विद्वान म्हणून गाजलेले होते, किंवा आमच्या अडीच - तीनशे मुलांच्या वर्गापुढे उभे राहून, साठ साठ मिनिटे अस्खलित आणि प्रसादयुक्त वक्तृत्व जे करीत, त्यांच्या संबंधाने ही आदराची भावना द्विगुणितच होत असे. पण, तो काळ असा चमत्कारिक होता की, गुरुजनांबद्दल वाटणारी आदराची बुध्दि दुसऱ्या एका कारणाने कलंकित व्हावी."[१७] याचे कारण हे प्रोफेसर्स मवाळ पक्षाचे म्हणजे टिळक-विरोधी होते. पुढे माटे म्हणतात,

"तेव्हा टिळकांच्या बद्दलची प्रीति तरुण लोकांच्या मनांत अशी गाढ बाणलेली होती की, त्यांच्या विरुध्द तोंडातून जर कोणी "ब्र" काढला, तर अत्युत्साही विद्यार्थी त्याच्यावर केवळ दांत-ओठ खात असत."[१८] माट्यांच्या मताप्रमाणे या प्रोफेसरांनी राजकारणापासून दूरच राहावयास हवे होते. म्हणजे ते त्यांना अधिक प्रिय झाले असते. "अलिप्ततेची आवश्यकता" या परिच्छेदात माटे म्हणतात,

"खरे म्हंटले म्हणजे आमच्या या प्रोफेसर्सनी राजकारणांतील पक्षाचा ओढा किंवा दुस्वास धरला नसता, तर बरे झाले असते. जर आपण विद्या शिकविणारे आहोत, तर आपण फक्त विद्याच शिकविली पाहिजे व राजकारणापासून अलिप्त राहिले पाहिजे हा दंडकच त्यांनी पत्करावयास हवा होता. असे झाले असते, तर या गुरुजना संबंधाने आम्हांला नितांत आदर वाटला असता."[१९]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

माट्यांनी आपल्या प्राध्यापकांविषयी असे म्हटलेले आहे, हे खरे. पण खुद्द माटे देखील एक अस्सल राजकारणी होते. व्यवहारी होते. राजकारणांतील डावपेचांची त्यांना उत्तम जाण होती. काही कारणास्तव ते राजकारणात, पडले नसले तरी टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाचे त्यांना जबरदस्त आकर्षण होते. टिळकांची जवळजवळ सगळी मते त्यांना पटायची. टिळकांच्याबद्दल त्यांच्या मनात केवळ दैवताचा भाव वसत असे. माट्यांचे हे टिळकप्रेम आत्मचरित्र वाचताना जागोजागी जाणवते.

ह्या सगळ्या गोष्टी सांगत असतानाच माट्यांनी टिळकांच्या राजकारणाची कल्पना दिली आहे. तेव्हा टिळकांच्या राजकीय चळवळीमुळे विद्यार्थ्यांच्या मनावर कसा परिणाम होत असे हे एका परिच्छेदात सांगितले आहे. माटे म्हणतात, टिळकांच्या राजकीय चळवळीमुळे "विद्यार्थ्यांच्या प्रवृत्तीत थोडासा प्रखरपणा, थोडा कडवेपणा, मिजाशीची उपेक्षा, साध्या राहणीची आवड, व्यसनांचा तिरस्कार ह्या गोष्टी सर्वत्र दिसून येत असत."[२०]

सातव्या प्रकरणांत - शहरांतील विद्यार्थी जीवन, पुण्यातील स्वस्त राहणीमान, मोकाट विद्यार्थी, टिळकांच्या राजकीय चळवळीच्या परिणामांमुळे विद्यार्थ्यांवर घडलेले विविध संस्कार, स्वदेशी चळवळ, पुढा-यांचा व विद्यार्थ्यांचा पोषाख, यानंतर नवी फॅशन, - यात बायकांच्या वेषात पडलेला फरक, वर्णिलेला आहे. नंतर "सामाजिक आपत्ती" यात प्लेगाच्या साथीची माहिती आली आहे. यातील एक दोन मुद्द्यांचा उल्लेख -

कॉलेजात गेल्यावर तेही बाहेरगावी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांवर कसलेही बंधन नसते. पण विद्यार्थ्यांवर बंधन असणे आवश्यक असते, असे माट्यांचे म्हणणे आहे. ते म्हणतात,"आमच्या

अभ्यासावर कोणाची तरी देखरेख असावयास हवी होती. विशेषत: मार्गदर्शन हवे होते ते त्या दिवसात मुळीच नसे."[२१] परिणाम विद्यार्थी थोडासा मोकाट बनलेला असे. तसे बनणे स्वाभाविक असते. कारण तिथे त्यांना कुणाचा वचक नसतो. जो तो आपापल्या तंत्रानुसार वागत असतो. कुणी त्याला रागावणारे नसतात. घरची मंडळी जवळ नसल्याने एक प्रकारचा बेछूटपणा त्यांच्या वृत्तीत येतो. माटे या संदर्भात म्हणतात,

"मॅट्रिक झाल्यावर मुले मोठी होतात, त्यांचे हिताहित त्यांना कळू लागते, असे वडील माणसे समजतात. पण ते सारे चूक आहे. या पोरांच्यावर पुढेसुध्दा देखरेखच पाहिजे. पालकांनी त्यांच्या डोक्याभोवती किरकिर करीत राहू नये हे खरे; पण आपल्यावर कोणी तरी अडपता - दडपता आहे, जाब विचारणारा आहे, असा धाक विद्यार्थ्याला असलाच पाहिजे. घर आणि शाळा सुटून शहराच्या वातावरणांत आल्यावर यांतले कांही शिल्लक रहात नाही. वास्तविक पाहतां, या वयांत मनाचा बनाव चालू असल्यामुळे ही देखरेख अवश्यच हवी."[२२]

माट्यांचे हे मत बरोबर असले तरी आपल्या या मोकाट वागण्याची विद्यार्थ्यांना त्यावेळी जाणीवही होत नसते हेही तितकेच खरे आहे. पण जेव्हा जाणीव होते तेंव्हा वेळ निघून गेलेली असते.

पुढे स्वदेशी चळवळीमुळे विद्यार्थ्यांच्या पोषाखांत - वागण्यात कसा बदल होत गेला याचे चित्रण आले आहे. यात नटणे, मुरडणे उपहास्य समजले जाऊ लागले, जास्त खाणे, नाटकाची आवड बाळगणे, हॉटेलात जाणे, विडया ओढणे ह्या सगळ्या सवयी स्वदेशी चळवळीमुळे आपोआप कशा सुटल्या हे थोडक्यात सांगितले आहे.

थोडक्यात या राजकीय चळवळीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर फारच अनुकूल होत गेला हे माटयांनी नमूद केले आहे.

खरे पाहता आत्ताही असल्या स्वदेशी चळवळीची नितांत गरज आहे. आजकाल आपल्याला स्वदेशी वस्तू कुठल्या व विदेशी कुठल्या हे देखील समजायला बरेच प्रयास पडतात. कालांतराने आपण संपूर्ण विदेशी मालाच्या, विदेशी संस्कृतीच्या आहारी जाऊ व याचे आपणास काहीही वाटणार नाही. वास्तविक पाहता आपल्या प्रमुख राजकीय नेत्यांनी ही "स्वदेशी चळवळ" आरंभावयास हवी. पण तसे घडत नाही ही आपली खरी शोकांतिका आहे.

यानंतर "पुढा-यांचे पोषाख" या परिच्छेदात टिळक, परांजपे, गोखले, भाऊसाहेब भोपटकर, तात्यासाहेब केळकर ह्या व्यक्ती कशा पध्दतीचा पोषाख करीत असत. याचे वर्णन अत्यंत रसिक वृत्तीने केले आहे त्याचे एक उदाहरण पाहू.

"शिवरामपंत परांजपे हे पोशाखाच्या बाबतीत कला व सौंदर्य यांकडे विशेष पहात असत. साधेपणाही नव्हे; आणि नखराही नव्हे, असा एक नटण्याचा प्रकार असतो, तोच शिवरामपंताचा असे. शिवरामपंत हे कडकडीत अंगरख्याच्या आंत मखमालीचे जाकीट घालीत; आणि डोक्याला गुलाबी पागोटे घालीत; कानांत बाळी, पायांत आगरकरी म्हणजे टाचेचा जोडा, मधून मधून डोकावत असलेले हिरवे जाकीट, आणि करवतीकांठी उपरणे अशा ऐटीने शिवरामपंत सभेला येत."[२३]

माटयांनी केलेल्या शिवरामपंतांच्या पोशाखाच्या वर्णनामुळे शिवरामपंतांना प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा होते. इतके सुंदर वर्णन त्यांनी केले आहे.

SHIVAJI UNIVERSITY

घरातील आर्थिक अडचणीमुळे पुढे माट्यांना १९०७ साली सातारच्या "न्यू इंग्लिश स्कूल" मध्ये नोकरी करावी लागली. या सुमारास देवधरांनी आजी - माजी विद्यार्थ्यांचे संमेलन भरविले होते. या संमेलनात माट्यांनी संस्कृत, इंग्रजी व मराठी अशा तीन नाटकांत काम केले. "त्राटिका" नाटकांत पित्याचे आणि "मर्चंट ऑफ व्हेनिस" मध्ये शायलॉकचे काम केले. या नाटकांतील कामामुळे [अभिनयामुळे] त्यांचे सर्वत्र कौतुक झाले. माट्यांना तर नाटकाची आवड पहिल्यापासूनच होती ते म्हणतात,

"तेव्हाच्या दिवसात नाटकाचा धंदा कमी प्रतीचा मानण्याची जी चाल होती, ती जर नसती, आणि मला जर गातां येत असते, तर एखादया वेळी मला वाटते की, मी नाटकांतहि गेलो असतो."[२४] माट्यांची ही आवड नंतर काही कारणाने कमी होत गेली याबद्दल दुस-या प्रकरणांत थोडेसे आलेलेच आहे.

यानंतरच्या परिच्छेदात त्या काळी होऊन गेलेल्या महाराष्ट्रातील काही नामवंत कार्यकर्त्यांची नावे माट्यांनी सांगितली आहेत, ती अशी.

"गेल्या शतकाच्या शेवटच्या पंचविशीत हळू हळू उदयास येऊन पुढे सुमारे ३५-४० वर्षे पर्यंत अनेक लोकांनी आपली कर्तबगारी महाराष्ट्राला दाखविली. फार चांगली चांगली माणसे तेवढया लहानशा काळांत महाराष्ट्रांत जन्माला आली. न्या.रानडे, लो. टिळक, ना.गोखले, डॉ.भांडारकर, विष्णूशास्त्री चिपळूणकर, अण्णासाहेब किर्लोस्कर, केशवसुत कवि, इतिहासकार राजवाडे, शि. म. परांजपे, सर्कसवाले विष्णुपंत छत्रे, बालगंधर्व, विष्णु दिगंबर पलुस्कर, डॉ;परांजपे, बाळकृष्णबुवा गवई, नट भाऊराव कोल्हटकर, न.चिं.केळकर, देवल, चिंतामणराव वैद्य अशी अगदी अव्वल दर्जाची

माणसे ऐन भरांत, असलेली त्यावेळी लोकांना पहावयास सापडली."[२५]

माट्यांनी वर उल्लेखिलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कार्याचा गौरव केला आहे. ह्या सगळ्या व्यक्तींबद्दल त्यांना अभिमानही वाटतो. टिळकांवर तर त्यांची अपार भक्ती होती. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात टिळकांबद्दलच बरेचसे लिहिलेले आहे.

शेवटच्या परिच्छेदात माटे आपल्या गणितातील कच्चेपणा-विषयी सांगतात. "या माझ्या वर्षभराच्या मास्तरकीत मला गणित येत नाही, हे सिध्द झाले. इंग्रजी दुसरीला सुध्दां मला गणित शिकवितां येईल, असे वाटेना. पुष्कळ लोक सांगतात की, मेहनत केली की गणित येते. हे त्यांचे सांगणे अगदी चूक आहे. मेहनतीला मी कधीही कंटाळत नव्हतो; मित्रमंडळीच्या आखाडयात बसून विशेषत: अंकगणिताची उदाहरणे मी खूप समजावून घेत असे. परंतु मला त्याचा कांहीही उपयोग झाला नाही. मी आकडयांना अजूनही बुजतो."[२६]

माट्यांनी आपल्या आत्मचरित्रात जगाचे दर्शन घडवीत असतानाच अधून-मधून कांही प्रकरणांतून स्वत:च्या स्वभावातील गुणदोषही मोकळेपणाने नि:संकोचपणाने सांगितलेले आहेत.

नवव्या प्रकरणांत "राजकीय आखाडयांतील मल्ल" या शीर्षकाखाली टिळकांच्या राजकीय चळवळीचे व त्यांच्या प्रभावी नेतृत्वाचे चित्रण आले आहे. याखेरीज राजवाडयांचे व्यक्तिचित्रणही यात रेखाटले आहे.

दहाव्या प्रकरणांतही टिळकांच्या राजकारणाचेच चित्रण आलेले आहे. यात राजकीय चळवळी, विद्यार्थ्यांना सदुपदेश, मनाचे परोक्ष, शिक्षण, राजकारणाचे आवाहन, सुरतेची कॉंग्रेस सभा, शिवरामपंताची भेट, अभिनव भारत मंडळाचे कार्य, [गुप्तसभा]

बंगाल्यातील राजकीय पुढारी - अरविंद बाबू यांचे कार्य, जहाल व मवाळ पक्षाची मते, दारूबंदी, प्रचारकांची बेहोषी, टिळकांना झालेली काळ्या पाण्याची शिक्षा. इ. विषयाचा समावेश होतो. याशिवाय यात मधूनच विद्वान भोजनभाऊ म्हणून संतवाङ्मयप्रेमी ल.रा.पांगारकरांचा उल्लेख आला आहे.

त्या प्रकरणांतील दोन-तीन मुद्दयांचा परामर्ष -

माटे सांगतात त्यावेळी विद्यार्थ्यांनी राजकारणात पडू नये आपला अभ्यास बरा की आपण बरे असा सदुपदेश त्यावेळी लोक करीत असत. टिळकांना मात्र या लोकांचा राग येत असे ते चिडून म्हणत. "लहानपणी विद्यार्थी म्हणून, तरुणपणी नोकर म्हणून, आणि म्हातारपणी पेन्शनर म्हणून, चळवळीत पडावयाचे नाही, तर मग चळवळ करावयाची कोणी.?"[२७] माट्यांना देखील टिळकांचे हे मत पटलेले होते. टिळकांच्या ह्या वक्तव्यावर माट्यांनी आपले एक चिकित्सक मत "विद्यार्थ्यांची ओढाओढ" या परिच्छेदात मांडले आहे व ते बरोबरही वाटते. ते मत असे.

"पूर्वीच्या काळी अठरा-एकोणीस वर्षांच्या वयाला मनुष्य कर्ता बनून प्रपंचालाहि लागत असे. सध्या त्या वयाची मुले मॅट्रिक होऊन कॉलेजमध्ये प्रविष्ट झालेली असतात. ख-या ज्ञानाचा पल्ला हस्तगत करावयास त्यांना जवळ जवळ पंचविशी ओलांडावी लागते. विद्यार्जनाचे काम चालू असल्यामुळे त्यांना विद्यार्थीच म्हणण्याची चाल असते; पण खरे म्हंटले म्हणजे ते चांगले प्रौढ बनलेले असतात; त्यांना बरे वाईट कळू लागलेले असते, समाजकारण, राजकारण इ.विषय त्यांच्या अभ्यासातहि आलेले असतात; समाजात या विषयांचा व्यापार त्यांना दिसत असतो. अर्थात असे प्रबुध्द लोक, केवळ एका बाजूला

विधार्जनाचे काम करीत आहेत म्हणून, सार्वजनिक कामांत लक्ष घालण्याला किंवा प्रसंगविशेषी त्यांत पडण्याला अपात्र आहेत, असे समजणे हे अगदी चूक आहे." [२८] यावरून माट्यांच्या विचारी मनाचे दर्शन घडते.

यानंतर माट्यांनी पुढच्या परिच्छेदात टिळकांच्या राजकीय नेतृत्वाचा गौरव केला आहे. ते म्हणतात, "टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाचे वर्चस्व इतके जबरदस्त होते की; राष्ट्रीय पक्षांतून त्यावेळी अनेक लहानमोठी माणसे आपापल्या कर्तृत्वाने समाजापुढे आली. नरसिंह चिंतामण केळकर, शि. म. परांजपे, ल. रा. पांगारकर, कृष्णाजीपंत खाडिलकर, सीतारामपंत दामले; भास्कर बळवंत भोपटकर अशी अनेक मंडळी सार्वजनिक आखाड्यात लोकांपुढे निरनिराळ्या कारणांनी उतरलेली होती. कोणी पत्रकर्ते म्हणून, कोणी लेखक म्हणून, कोणी वक्ते म्हणून; कोणी गुप्त चळवळी करणारे म्हणून." [२९]

अकराव्या प्रकरणात देखील टिळकांच्या राजकारणाचाच उल्लेख जास्त आला आहे. त्यात गुप्त चळवळी, झडत्या व छापे, सोसायटीची गांजणूक, गणपतीतले मेळे, राजकीय प्रवाह, इंग्रजांचे अनुकरण, नव्या चालीरीती, टिळक गोखले वैर. देशातील अकल्पित घडामोडीचा परामर्ष इ.चा समावेश होतो. थोडक्यात या काळात सशस्त्र क्रांतीची चळवळ सुरू झालेली होती हे सांगितले आहे. पुढील परिच्छेदात बालगंधर्व, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, काशिनाथशास्त्री लेले यांचे व्यक्तिचित्रण आलेले आहे.

त्याकाळी महाराष्ट्रात काही संस्था राजकीय शिक्षणाची व लोकजागृतीची कामे करीत होती. त्या संस्था म्हणजे गणपतीतले

मेळे, [गणेशोत्सव] शिवाजी उत्सव, हरदास अथवा कथेक-यांचे आख्यान. या सगळ्या संस्थांनी ऐतिहासिक व्यक्तींच्या पराक्रमावर आख्याने रचून राष्ट्रीय मतप्रचाराला जोरदार पाठींबा दिला. हे माट्यांनी सविस्तर सांगितले आहे.

यानंतर तापसी संशोधक म्हणून वि.का.राजवाडे यांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या स्वभावातील दोषही स्पष्टपणे सांगितले आहेत ते असे. "हा इतिहासकार मोठा गाढा पंडित होता. २८ वर्षांच्या वयाला कुटुंब निवर्तल्यापासून याने प्रापंचिक जीवनाकडे ढुंकूनही पाहिले नाही. महाराष्ट्र देशाच्या इतिहास सामग्रीचे संशोधन हा त्यांचा शोक नव्हे, हव्यास नव्हे तर हे त्यांचे व्यसनच बनलेले होते. स्वभावाने तुसडा आणि तिरसट असलेला हा नि:स्पृह विद्वान आसपासच्या लोकांत एक त-हेची भीति उत्पन्न करीत असे. सरकारी नोकर आणि इंग्रजांचे सेवक यांच्या संबंधाने राजवाड्यांच्या मनात जालीम तिरस्कार असे आणि तो व्यक्त करण्याची त्यांची पध्दति जवळजवळ ग्राम्य असे. त्यांच्या व्याख्यानाचा एक चुटका माटे सांगतात, स्वदेशी कापड आणि साखर हा त्या वेळचा मुख्य घोष होता. एकदा राजवाडे व्याख्यान देताना म्हणाले, "साखर कशाला हवी आहे ? गेल्या वीस वर्षांत मी पेढा खाल्ला नाही, म्हणून मी कांही मेलो आहे काय ?"[30]

"राष्ट्र निपचित पडले" या बाराव्या प्रकरणांत - राष्ट्रातील घडामोडी, देशभक्तांना होणारा पोलीसांचा जाच, शिवरामपंतांची सुटका, दुबळे राष्ट्र [फ्रान्स], केळकरांनी टिकवून ठेवलेले राजकारण इ.चे चित्रण आले आहे. यानंतर पुढील टप्प्यात माट्यांनी थोडी वैयक्तिक माहिती दिली आहे. यात त्यांची वाचनाची आवड, त्यांनी केलेला नाटकांचा अभ्यास, विद्यार्थी दशेची

समाप्ती, माधवानुज या कविची ओळख, गडकऱ्यांची ओळख, कवितेची हौस त्यांनी स्वीकारलेली काही व्रते, त्यांनी केलेली काही सार्वजनिक कामे, स्वत:च्या "भूपाळी" या कवितेचा उल्लेख, अडचणीच्या प्रसंगी देवधरांना केलेले मदतीचे आवाहन, खाडिलकरांची सहेतुक रचना, हरिभाऊंनी दिलेले शिक्षण, टिळकांचे राजकीय धोरण, सामाजिक, राजकीय प्रश्नाबद्दलचा वाद, वडील बंधूच्या अकाली मृत्यूबद्दल दु:ख, मी सामाजिक कार्याकडे का वळलो ? यानंतर स्वत:च्या लेखनाविषयी व यातच काही नामवंत प्राध्यापकांचे व्यक्तिचित्रण इ. विषयाचा समावेश होतो. या प्रकरणांतील एक दोन परिच्छेदांचा उल्लेख.

प्रकरणाच्या सुरुवातीस गुप्त सभेतील कार्यकर्त्यांच्या चळवळीमुळे विद्यार्थ्यांकडे पाहण्याची सरकारची दृष्टी कशी संशयी बनली होती हे सांगितले आहे. तशातच बॉंब गोळ्याचे तत्वज्ञानही तरुणांमध्ये पसरल्यामुळे पोलीस लोक सतत विद्यार्थ्यांवर नजर ठेवून असत. माटे या कटात सहभागी नसले तरी त्यांचे मित्र, मित्रांचे मित्र यात सामील असल्यामुळे माट्यांना देखील पोलिसांचा जाच सहन करावा लागे. आणखी एक गोष्ट म्हणजे माटे ज्या शाळेत शिक्षकव्यवसाय होते तेथील शिक्षक वर्गाचा देखील माट्यांवर असाच संशय असे ते म्हणत, "माटे व त्याचे मित्र हे गुप्त चळवळीचे परोक्ष पुरस्कर्ते आहेत."[३१] माटे म्हणतात, हे मत शेवटपर्यंत टिकून होते. त्यात आणखी एक भर अशी पडली की, माटे शाळेतील मंडळींनी ठरविलेल्या कुठल्याही कामांत सहभागी होत नसत. या कारणांमुळे देखील ही मंडळी कांही ना काही अफवा उठवीत. परंतु माटे शाळेच्या कामांत का सहभागी होत नसत याचे कारण त्यांनी

आत्मचरित्रात पटण्यासारखो सांगितले आहे. फर्ग्युसन कॉलेजमधील प्रोफेसर्स सुध्दा त्यांच्याकडे संशयी नजरेने पहात असत. ह्या वरील कारणामुळेच माट्यांना "काळ" पत्रातील लिखाण थांबवावे लागले होते.

यानंतर शिवरामपंत परांजपे, अच्युतराव कोल्हटकर, विनायक दामोदर सावरकर, सेनापति बापट या देशभक्तांचे तुरुंगात झालेले हाल, पोलिसांनी त्यांचा केलेला अनन्वित छळ व नंतर त्यांची झालेली सुटका याचे चित्रण आलेले आहे.

पुढील परिच्छेदात दुबळे राष्ट्र म्हणून फ्रान्सचा उल्लेख आला आहे. हे राष्ट्र सुरुवातीस ब-या स्थितीत होते पण नंतर त्याची कशी दुर्दशा झाली हे सांगताना माटे म्हणतात,

"राज्यक्रांतीच्या वेळी फ्रान्स देशात मानव्याच्या बंध विमोचनाचा जयजयकार झालेला होता आणि म्हणून फ्रान्सचा "स्वातंत्र्याचा वाली" असा लौकिक झालेला होता. तथापि अनुभव आला तो मात्र अगदी निराळा आला. ह्या मोडकळीस येत असलेल्या राष्ट्राला जेव्हा हिटलरने जोराचा तडाखा दिला तेव्हा मला दुष्टपणानेच का होईना पण थोडासा आनंद झाला."[३२] माटे असे का म्हणतात, याचे कारण म्हणजे याच राष्ट्राने सावरकरांना पकडून इंग्रजांच्या हवाली केले होते.

यानंतरच्या परिच्छेदात टिळकांना सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा झाली तेव्हा टिळकांच्या अनुपस्थित न. चिं. केळकरांनी अतिशय कठीण प्रसंगांना तोंड देत राजकारणाची धुरा मोठ्या उमेदीने कशी टिकवून ठेवली हे सांगितले आहे. पुढे टिळकांची सुटका झाली तेव्हा त्यांनी देखील केळकरांचा गौरवच केला आहे.

पुढे "गुरूणां गुरू: ।" या उता-यात वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांचे शब्दचित्र रेखाटले आहे. ते असे. "वासुदेवशास्त्री आम्हांला संस्कृत शिकवीत. नारोशंकरी घांटा जशी खणाणून वाजते, तसे शास्त्रीबुवा तासतासपर्यंत खणाणून बोलत असत. एक वाक्य त्यांनी कधी मागे पुढे होऊ दिले नाही. प्रतिपादनात गोंधळ नाही, विवेचनांत कुठे गुल्म नाही. अनावश्यक पुनरावृत्ति नाही. असा वक्तृत्वाचा ओघ अखंड चाललेला असे. विद्वान म्हणजे काय हे त्यांचे प्रतिपादन चालू असतांना प्रत्ययास येई व मन आदराने भरून जाई."[३३] माटे पुढे म्हणतात, "माझ्या सर्व विद्यार्थीदशेत माझ्या मनावर जर कोणाच्या सौजन्याचा मार्मिकतेचा आणि विद्वत्तेचा दृढ संस्कार झालेला असेल, तर तो सीतारामपंत देवधर व वासुदेवशास्त्री ह्यांचा होय."[३४]

पुढील परिच्छेदात "कवितेची हौस" या शीर्षकाखाली त्यांना असलेली कविता लिहिण्याची आवड या संदर्भात चर्चा केली आहे. माट्यांना कविता लिहिण्याची खूपच हौस होती. तसा त्यांनी ब-याच-वेळा प्रयत्नही केला होता. त्यांची "अहल्येची भूपाळी" ही कविता मात्र चांगली वठली होती. व शिवरामपंतांनी ह्या कवितेची तारीफही केली होती असा आत्मचरित्रात उल्लेख आहे. ही एक कविता सोडली तर त्यांना पुढे चांगली कविता लिहिणे फारसे जमले नाही. माटे याविषयी खेदाने म्हणतात. "भुकेलेला लांडगा चिखल खातो."[३५] तसा माझा: प्रयत्न होता. त्यामुळे मी तो नाद सोडून दिला.

याच प्रकरणात माट्यांनी "विधात्याचा न्याय" यात आपल्या दोन वडील भावांच्या अकाली निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. कारण ह्या दोघांनीही माधुकरी मागून आपले शिक्षण पूर्ण केले होते. यामुळे माट्यांना अधिकच वाईट वाटे. ते या संदर्भात

SHIVAJI UNIVERSITY (LIBRARY) KOLHAPUR

म्हणतात, "लहानपणी भोगलेल्या ह्या हालाची परतफेड करण्यासाठी विधात्याने त्यांना जास्त दिवस जगवावयास हवे होते; आणि चार सुखाचे दिवस त्यांना दाखवावयास हवे होते."[३६]

याच काळांत नवकाव्याचा उदय झाला. व "मनोरंजन" मासिकाद्वारे बालकवि, केशवसुत, गडकरी इ. कवींनी यात लेखन केले हे सांगितले आहे.

यानंतर माट्यांनी आपल्या सामाजिक कार्यास आरंभ करतेवेळी व विद्यार्थीदशेत असताना काही व्रते स्वीकारली होती. ती त्यांनी शेवटपर्यंत पाळली. पुढे शाळेत शिक्षक असताना तेथील सहकार्यांच्या साहाय्याने काही सार्वजनिक कामे केली. यात सामूहिक व्यायाम, म्युनिसिपल स्वच्छता, कंझ्यूमर्स असोसिएशन संस्था स्थापून विद्यार्थ्यांना व्यापारी शिक्षण देणे इ.चा समावेश होतो. परंतु माट्यांना या कामांत यश आले नाही.

"सार्वजनिक जिविताचे द्वार व दर्शन" या तेराव्या प्रकरणांत खाजगी क्लासची सुरूवात, "वसंत व्याख्यानमाले" तील त्यांचे चिटणीसी पदाचे कार्य, पुढे याच संदर्भात रानड्यांचे चित्र रेखाटून त्यांच्या राजकीय तत्वज्ञानाची कल्पना दिली आहे.

पुढे तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडवीत असतानाच विष्णुबुवा ब्रम्हचारी व महात्मा फुले यांच्या कार्याची चिकित्सा केली आहे. याशिवाय प्रार्थना समाजाचे कार्य व पुणेरी पंडितांचा दरारा या परिच्छेदात न्यायमूर्ति रानडे व कुंटे यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

"वसंत व्याख्यान माले" च्या चिटणीसी पदामुळे माट्यांना बराचसा फायदा झाला. ना.पु.कर्वे व माटे या दोघांनी "वसंत व्याख्यानमाले" च्या व्यवस्थेत पुष्कळ सुधारणा केल्या. ही संस्था प्रथम न्यायमूर्ति रानडे यांनी स्थापन केली होती. नंतर त्याची सूत्रे श्री.भाट यांच्याकडे आली. श्री.भाट हे निवृत्त झाल्यावर माट्यांकडे हे चिटणीसाचे कार्य आले. माटे या मालेशी अनेक नात्यांनी निगडीत होते. मालेमुळे त्यांचा अनेक नामवंत वक्त्यांशी परिचयही झाला. "वसंत व्याख्यानमाले" संबंधी दुस-या प्रकरणात थोडेसे आलेले आहे. त्यामुळे इथे त्याचा जास्त उल्लेख करीत नाही. याच प्रकरणात शेवटी माट्यांनी स्वत:च्या वक्तृत्वासंबंधीची माहिती दिली आहे.

चौदाव्या प्रकरणाला "टिळक सुटले" असे नाव दिलेले आहे. पण सुरुवात मात्र एक सामाजिक संस्था "पोवाडे" पासून केली आहे. यात पोवाड्वाले, माधुकरी संस्था, विद्येसाठी ओम भवति! शेतकरी सावकार संबंध, शेतक-याचा पक्षपात, डी.ई.सो.चा व्याप, सामाजिक चाली-रिती, संस्कृत ज्ञानाचा पल्ला, ज्ञानाची अवस्था, पुण्याचे जिमखाने, इंग्रजी खेळाचा परिचय [क्रिकेट] एवढया सगळया विषयाची माहिती दिल्या नंतर माटे "टिळक सुटले" या प्रश्नाकडे वळतात. पुढे टिळकांचे राजकारण, गोखल्यांचे व्यक्तिमत्व, टिळकांचे गीतारहस्य, सत्यशोधक समाजाची चळवळ, दिपलेले लोकहतवादी, फुल्यांचा दोष, ब्राह्मण पुढा-यांची चूक, विठ्ठलराव शिंद्यांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य, शेक्सपियरच्या नाट्यतंत्राचे अनुकरण, गडक-यांचे विनोदी लेखन, इ.विषयाबद्दल चर्चा करून शेवटच्या परिच्छेदात कोणी काय केले ? हे थोडक्यात सांगितले आहे.

वरील एक दोन मुद्दयांचा परामर्श -

सध्या नामशेष झालेली "माधुकरी" नावाची एक उपयुक्त सामाजिक संस्था त्या काळी अस्तित्वात होती. तिच्या आश्रयाने त्यावेळी शेकडो विद्यार्थ्यांनी विद्यार्जन केले होते. त्यावेळी विद्यार्थ्याला माधुकरी घालणे हे एक नैतिक व धार्मिक कृत्य समजत असत. सध्याच्या जमान्यात असे समजणे किंवा माधुकरी घालणे कसे अशक्य आहे हे सांगण्याची गरज नाही. माटयांनी याचा उल्लेख एका कारणासाठी केला आहे. ते म्हणजे त्यांच्या पाच भावंडापैकी तिघांना ह्या संस्थांचा आश्रय घ्यावा लागला होता. म्हणून माट्यांना याचे राहून राहून दुःख होत असे.

या प्रकरणांत म.फुले व लोकहितवादींच्या कार्याबद्दल माट्यांनी आपले चिकित्सक मत मांडले आहे. त्याचा परामर्श -

"दिपलेले लोकहितवादी" व महात्मा फुल्यांच्या कार्याची माहिती देताना मात्र लोकहितवादींना "दिपलेले लोकहितवादी" असे म्हणून येथे काहीसा लोकहितवादीचा अधिक्षेप केला आहे असे वाटते. वस्तुत: लोकहितवादींनी इंग्रजांच्या शास्त्रज्ञानांची, संशोधक बुध्दीची प्रशंसा करुन भारतीयांच्या परंपरावादी, अंधश्रध्दामूलक विचारांची निर्भत्सना केलेली आहे. अशी टीका करण्यामागे आपल्या लोकांनी आधुनिक सुधारणांचा व शास्त्रज्ञानाचा स्वीकार करावा ही स्पष्ट भूमिका आहे. अशी भूमिका घेणे चुकीचे नव्हते. पण लोकहितवादी यांना "दिपलेले" असे संबोधणे हे काहीसे त्यांचा उपहास करण्यासारखे आहे. लोकहितवादी म.फुले, आगरकर यांचे विचार एका विशिष्ट कालखंडात लोकांना चमत्कारिक वाटत होते. विशेषत:

मध्यम वर्गीयांना ही सुधारणावादी विचारधारा टीकास्पद वाटत होती. एका बाजूला इंग्रजांविरूद्ध चाललेले भारतीयांचे मानसिक युध्द आणि दुस-या बाजूने इंग्रजांच्या विद्येचे आणि विज्ञानाचे अनुकरण करावे हा विचार, यांचा परस्परांचा संघर्ष होत होता. त्यामुळेच माटयांच्या काळातील बुध्दिजीवी लोकांनी लोकहितवादी आणि फुले यांना फारशी मान्यता दिली नाही. त्यांची उपेक्षा विशेषत्वानी केली. विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी "निबंधमाले" तून लोकहितवादी, फुले आणि स्वामी दयानंद यांच्यावर केलेली अतिरेकी टीका प्रमाण मानली गेली होती. माटे हे स्वतंत्र बुध्दीने विचार करणारे विचारवंत आहेत. त्यांनी "आमच्या भावी उध्दाराचे [लोकहितवादींनी] बांधलेले आडाखे कालांतराने खरे ठरले आणि म्हणून त्यांची गणना आधुनिक राजकीय तत्वज्ञ पुरूषांत व्हावी हे बरोबर आहे."[३७] असे म्हणून लोकहितवादींच्या पदरात काहीसा न्याय टाकला असला तरी वैदिक धर्माची आणि संस्कृत विद्येची लोकहितवादींनी निरर्गल निंदा केली. असे म्हटले आहे. वस्तुत: वैदिक धर्माची आणि संस्कृत विद्येची लोकहितवादींनी निंदा केली नाही. उलट आपल्या अन्य ग्रंथातून या धर्माची व विद्येची त्यांनी प्रशस्ती केली आहे. संस्कृत विद्यासंपन्न लोक विज्ञानाकडे पाठ फिरवतात आणि जगातले "यच्चयावतज्ञान" संस्कृत ग्रंथातच भरले आहे असे मानतात. या समजूतीवर त्यांनी टीका केली आहे.

पुढील परिच्छेदात "फुल्यांचा दोष हाच" या शीर्षकाखाली माटे यांनी व्यक्त केलेली मते त्यांच्या दृष्टीने बरोबर असली तरी फुल्यांचे अभ्यासक हे या मतांना मान्यता देऊ शकणार नाहीत. त्यांचे विधान असे,

"ज्योतिराव फुले ह्यांच्याहि प्रतिपादनात हाच दोष होता. प्रत्येक गोष्टीचे टिपरक त्यांनी ब्राह्मण वर्गाच्या माथी ठेवले."[३८] महात्मा फुले यांच्यावर ब्राह्मण द्वेषाचा आरोप अनेकांनी केला पण हा आरोप निराधार वाटतो. ज्या काळात ब्राह्मण वर्गाच्या हातात राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक सत्ता होती त्या काळात बहुजन समाजाचे वेगवेगळ्या पातळ्यावर शोषण झाले ही सत्यकथा आहे. फुल्यांच्या लेखनात आवेश आणि तळमळ आहे. पण एखाद्या जातीचा द्वेष करण्याची त्यांची प्रवृत्ती नाही. हे फुल्यांच्याच जीवनकार्यावरून दिसून येते.

आत्मचरित्रात आपली जी मते असतील ती मांडण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य लेखकाला असते व असावे. याचा दृष्टिकोन सर्वांनाच मान्य होईल असे नाही. पण माटे यांच्यासारख्या चिकित्सक विद्वानाची आणि विचारवंतांची फुले लोकहितवादी यांच्याबद्दल जी प्रतिक्रिया व्यक्त झाली ती लक्षात घेता त्यांच्या काळातील सर्वसाधारण रूढीवादी माणसाची प्रतिक्रिया काय झाली असेल याची यावरून कल्पना येते.

"ब्राह्मण पुढा-यांची चूक" या उपशीर्षकाखाली श्री.माटे यांनी "महाराष्ट्रातील मुख्य मुख्य ब्राह्मण पुढा-यांनी कोणती चूक केली" ते सांगितले आहे. कोल्हापूरच्या गादीवर शाहू छत्रपती आरूढ झाले होते. त्याबद्दल लेखक म्हणतात, "माझे तर असे मत आहे की, ताराबाई साहेबांच्या नंतर कोल्हापूर राजघराण्यात ह्या छत्रपतीच्या इतकी प्रबळ आसामी दुसरी झालीच नाही."[३९] या विधानानंतर लेखकाने वेदोक्त आणि पुराणोक्त वादाचा उल्लेख करून छत्रपती शाहू महाराजांना वेदोक्ताचा अधिकार निश्चित आहे. अशी भूमिका ब्राह्मण पुढा-यांनी स्वीकारायला हवी होती. पण

ती न स्वीकारून त्यांनी मोठी चूक केली अशा आशयाचे प्रतिपादन केले आहे. ही भूमिका उचितच आहे. माटे यांच्याप्रमाणे वेदोक्त-पुराणोक्त प्रकरणाच्या काळात तर्कवादी व समाजनिष्ठ प्रवृत्तीचे ब्राह्मण पुढारी असते तर महाराष्ट्राच्या इतिहासाला अनिष्ठ वळण देणारे वेदोक्त पुराणोक्ताचे प्रकरण उत्पन्नच झाले नसते. माटे पुढे म्हणतात,

"एकंदर समाजाचे हित राखण्याचे ज्याचे कंकण, तो ब्राह्मण सुधारक वर्ग, टिळकांना मागे सारून ह्या प्रसंगी समाजातील भावी दुही मिटविण्यासाठी जलदीने पुढे आला असता, तर पुढे महाराष्ट्राच्या चिरफाळ्या करणाऱ्या एका वादांतून आपण बचावलो असतो पण ते झाले नाही हेच खरे. आणि मग आधीपासूनच कांहीसा नाराज झालेला मराठा समाज छत्रपतींच्या ह्या अवमानामुळे सत्यशोधक समाजाचा अनुयायी बनला. ह्याच्या आधीपासूनही एखादा तुरळक मराठा ह्याचा अनुयायी झालेलाही असेल. पण नवी जागृति प्राप्त झालेला सगळा मराठा वर्गच्या वर्ग छत्रपतींच्या ह्या अवमानाने त्या समाजांत जाऊन दाखल झाला. आणि सत्यशोधक समाजाची चळवळ म्हणजे मराठा समाजाने आरंभलेली उत्थानाची चळवळ, असा तिचा अर्थ होऊन बसला."[४०]

या सगळ्यांतून माटयांच्या विचार प्रवर्तक मन:प्रवृत्तीचे दर्शन आपणांस घडते.

यानंतर नवा पुढारी म्हणून म.गांधीचा उल्लेख आला आहे. टिळकांच्या मृत्यूनंतर म.गांधीचे आगमन झाले. माटे म्हणतात, "एका महापुरूषाच्या मागून दुसरा महापुरूष येणे हा कालाचा आशीर्वाद ह्याही प्रसंगी लागू पडला."[४१]

"शेवटी कोणी काय केले" ?

या परिच्छेदात प्रत्येकांनी केलेल्या कार्याची त्रोटक माहिती आली आहे. "हरिभाऊंनी कादंब-या लिहून आगरकरांचे कडकडीत विचार समाजाच्या गळीच बांधले. राजवाडे, पारसनीस, शंकरराव देव [धुळे] हयांनी शिवाजी आणि रामदास हयांच्या संबंधीचे अभिमान संशोधनाने जागृत करून वाङ्मय, व्युत्पत्ति, चिकित्सा, हयांचे नवे पायंडे समाजाला घालून दिले. किर्लोस्कर, देवळ, कोल्हटकर, गडकरी, खाडिलकर हयांनी नाटकांचे मैदान खूप शर्थीने सांभाळले होते. आणि केशवसुतानी नव्या काव्याचा स्वच्छ निराळा प्रकाश महाराष्ट्रात पाडलेला होता. विठ्ठलराव शिंदे हयांनी "निराश्रित सहाय्यकारी मंडळ" काढून निकृष्ट समाजाच्या हीन-दीन स्थितीकडे समाजाचे लक्ष वेधिले होते."[४२] यानंतर डॉ.केतकर या विषयात विद्वानाचा परिचय करून दिला आहे. पुढे विष्णु दिगंबर पलुस्कर यांनी गायनाची विद्या उच्च पातळीवर नेली. तसेच छत्रे व देवल या मंडळीनी सर्कसीचा एवढा व्याप मांडला की, त्यांचे नांव चीनपासून इटलीपर्यंत गाजले. हे सांगतानाच नक्लाकार भोंडे व सुप्रसिध्द आयरिश विदुषी डॉ. बेझांट यांच्या थिऑसॉफीचा प्रसार याच काळात झाला हे सांगितले आहे.

पंधराव्या व सोळाव्या प्रकरणांत त्यांनी केलेल्या "अस्पृश्यता निवारणाच्या कार्याची माहिती आली आहे.

सतराव्या प्रकरणात अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास मदत करणा-या सहाय्यकांची ओळख मात्यांनी करून दिली आहे. यात बॅ.अग्रवाल, कुलकर्णी व जेजुरीकर, कोकणे व गोखाले, सदाशिवराव गोडबोले, सदाशिव नाडकर्णी, रघुनाथ दिवेकर, राजभोज, वायदंडे यांचा समावेश होतो. यातच मात्यांना या कार्यात आलेले अनुभव,

त्यांची समाजाने केलेली निंदा इ.ची माहिती आली आहे. याशिवाय महात्मा गांधीच्या चळवळीचा परिणाम म्हणून सुताच्या प्रयोगाचा उल्लेख आलेला आहे.

अठरावे प्रकरण देखील अस्पृश्यता निवारणावरच आहे. यात "सार्थ वचने" मातंग वस्ती, जातवार सभा, चर्मकार परिषद, मातंग परिषद, धर्मांतरांची लालूच, पाणी व देवळाचा प्रश्न, नाशिकची परिषद, काही वेचक वाक्ये व सुचक विधाने इ. विषयांचा समावेश होतो.

एकोणिसाव्या प्रकरणांत महात्माजींचे अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासंबंधीचे मत, धर्मसुधारणेवर चर्चा, अस्पृश्यता निवारणासंबंधी दोघांत झालेले मतभेद [पत्राद्वारे] संस्कृतीचा आग्रह, इ. विषयी आपले चिकित्सक मत मांडले आहे.

विसाव्या प्रकरणांत "समाज-विचार मंडळ" या संस्थेद्वारे माट्यांनी केलेल्या काही उपक्रमांची माहिती आली आहे.

या संस्थेद्वारा माट्यांनी समाजप्रबोधनाचे काम केले. हिंदू समाजातील जातीव्यवस्थेवर, धर्मव्यवस्थेवर त्यांनी भरपूर अभ्यास करून स्वत:ची काही नवीन मते समाजापुढे मांडली. या मंडळाद्वारे त्यांनी अनेक उपक्रम राबवले. काही सामाजिक समस्या सोडवल्या. उदा. माधवराव जोशी व आचार्य अत्रे यांच्या संदर्भात उघडलेली अश्लीलता विरोधी आघाडी, प्राचीन परंपरांचा दुराभिमान बाळगणाऱ्या शंकरराव राजवाड्यांचा केलेला दंभस्फोट, याशिवाय त्यांनी आणखी कितीतरी कामे या मंडळाद्वारे केली.

एकविसाव्या प्रकरणात माट्यांनी केलेल्या ग्रंथसंपादनाची माहिती आली आहे. त्यात "केसरी गौरव ग्रंथ","केळकर ग्रंथ", "सांवत्सरिकाची रचना" इ. ग्रंथाचा समावेश होतो.

बाविसाव्या प्रकरणात महाराष्ट्रांतील मतमतांतरे, राजकीय परिस्थिती, राजकारणामुळे पुढील स्वातंत्र्यकाळात घडणारे बदल, दारूचे पिढठे, मुळशीचे धरण, म.गांधीचे आगमन, १९९० ची सविनय कायदेभंगाची चळवळ, चवरीचु-याचा गोळीबार, केळकरांचा झुंजातील संभावितपणा, बारडोली सत्याग्रह. यानंतर यातच स्त्रियांचे बंधविमोचन, कुलीन स्त्रिया व नाटके इ. विषयाची मीमांसा केली आहे.

"म.गांधींचे आगमन" या उपशीर्षकात माट्यांनी टिळकांच्या नंतर म.गांधीच्या नेतृत्वाची चिकित्सा केली आहे. माटे म.गांधी-बद्दल म्हणतात,

"म.गांधी या लोकोत्तर पुरुषाचा राजकारणांतील प्रवेश हा टिळकांच्या मृत्यूनंतर आकाशांतून देवाच्या कृपाप्रसादाचा जसा वर्षाव व्हावा, तसा सर्व लोकांना वाटला; व हिंदुस्थानचे भवितव्य याच महापुरुषाच्या हाती आहे, अशी लोकांची खात्री होऊन चुकली. टिळक मेल्यानंतर सरकारास आव्हान देणारा म.गांधीसारखा कोणी लोकाग्रणी पुढे आला नसता, तर शिगेस पोचत चाललेले राजकारण मध्येच धाबकल्यासारखे झाले असते; आणि जनता निर्नायक बनून गोंधळून गेली असती. परंतु आज रात्री टिळकांनी जावे, आणि उद्या सकाळी गांधींनी त्वेषाने पुढे यावे, अशी नाटकांतसुध्दा असंभाव्य वाटणारी घटना सुदैवाने घडून आली. त्यांनी राजकारणांत भरलेला रंग हा परमार्थप्रवण होता. त्यामुळे ते हिंदुस्थानांतील जनतेला आकर्षक वाटले."[५३]

यानंतर "हेत्वाभासांचा परिस्फोट" यात महात्मा गांधी व केळकर यांच्या वृत्तपत्रातील झुंजाची माहिती दिली आहे. केळकरांनी

गांधीच्या प्रतिपादनातील अहिंसा, सत्य न्याय, बहिष्कार इ. विषयाच्या संदर्भात म. गांधीच्या लेखनावर जोराचा प्रहार केला. त्यातील अव्यवहार्यता, हेत्वाभास मोडून काढले. तेही गांधीजींचे मन न दुखावता अत्यंत कौशल्याने तर्कबुध्दीने हे काम केले. ही दोघांची झुंज तब्बल १५ वर्षे चालू होती. माट्यांनी केळकरांचा "लोकोत्तर संपादक" म्हणून गौरव केला आहे व हे बिरूद योग्यही आहे.

तेविसाव्या प्रकरणात त्यांनी केलेल्या ग्रंथरचनांची माहिती आली आहे. यात "अस्पृष्टांचा प्रश्न", "हिंदुसमाज दर्शन", "विज्ञान बोधाची प्रस्तावना", "पाश्चात्य पुरूषश्रेष्ठ" इ. ग्रंथाचा समावेश होतो. पुढे "दुर्दैवाचा फेरा" या परिच्छेदात कौटुंबिक परिस्थितीचे चित्रण व काही दु:खद घटनांचा उल्लेख आला आहे.

यानंतर "जोड प्रपंच कसा बाधक ठरतो" हे स्वत:च्या अनुभावावरून सांगितले आहे. माटे म्हणतात, "बंधुप्रीति म्हणून किंवा जबाबदारीची नैतिक जाणीव म्हणून जरी कांही बोजा शिरावर घेतला, तरी तो पैशाच्या रूपाचा घ्यावा; जोड प्रपंचाच्या स्वरूपाचा घेऊ नये. जोड प्रपंच हा नेहमीच विजोड ठरतो. म्हणून माझे असे मत झाले आहे की, साहय करावयाचे, ते दरमहा उचलून दिलेल्या द्रव्याच्या रूपाने करावे. म्हणजे दोघांनाही सुख लाभण्याचा संभव असतो."[४४] माट्यांनी काही दिवस भावाच्या प्रपंचाची जबाबदारी स्वीकारली होती. परंतु ते त्यांना झेपले नाही. याचे कारणही त्यांनी आत्मचरित्रात दिलेले आहे.

"एकदम विद्वान ठरलो!" या परिच्छेदात माटे प्रोफेसर म्हणून "सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये लागले. तेंव्हा माटे या नोकरीविषयी फारसे संतुष्ट नव्हते. ते याबद्दल खेदाने लिहितात, "मी कॉलेजात

आलो; आणि नवलाची गोष्ट ही की, लोकांच्या दृष्टीने मी एकदमच मोठा झालो. ते मला विद्वान ही म्हणू लागले."[४५] पुढे म्हणतात, "तुम्ही कितीही वाचा, कितीही लिहा, केवढेही वक्तृत्व करा, आणि सार्वजनिक कामांत कितीही स्वार्थत्याग करा; पण तुम्ही जर मास्तर असला, तर तुमची रया गेली म्हणून समजा."[४६]

माटे असे का म्हणतात ? हे विचार करण्यासारखे आहे. समाजात शिक्षकाचे पद हे सामान्य दर्जाचे समजले जाते. व त्यानुसार त्या पेशाबद्दल एक विशिष्ट मत बनलेले असते. "तो काय साधा मास्तर आहे" असे उपहासाने बोलले जाते. खरे पाहता कुठल्याही व्यक्तीची गुणवत्ता त्याच्या पदावरून ठरवली जाऊ नये. तर त्याच्या गुणवत्तेवरून ठरवली जावी. पण तसे घडत नाही. याचेच माट्यांना वाईट वाटते. माट्यांनी शिक्षक असतानाच कितीतरी महत्त्वाची व सामाजिक प्रतिष्ठा लाभणारी कामे केली होती. तेव्हा मात्र त्यांच्याकडे कुणाचे लक्ष गेले नाही. कारण तेव्हा ते शाळा मास्तर होते. पण जेव्हा ते प्रोफेसर झाले, आपल्या आहे त्या पदापेक्षा किंचित वर गेले, तेव्हा मात्र लोकांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा बदलला - बदलत गेला हे पाहून माट्यांना आश्चर्य व थोडे वाईटही वाटले.

माटे पुढे १९४३ साली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले तेव्हाही त्यांनी असेच उपरोधात्मक उद्गार काढले आहेत. "मी जर अजून मास्तरच राहिलो असतो, तर ते मला मिळाले असते का,याविषयी मला जबर शंका आहे."[४७] असे त्यांनी प्रि. करमरकर यांच्याजवळ बोलूनही दाखविले. म्हणजे स्वत: माटेही शिक्षकी व्यवसायात फारसे संतुष्ट नव्हते असे दिसून येते.

यानंतर माट्यांनी "माझे वृत्तपत्र लेखन" यात "झंकार" पत्रात लिहिलेल्या कथांचा उल्लेख केला आहे. यातूनच "उपेक्षितांच्या अंतरंगा" चा जन्म झाला. माट्यांच्या ह्या कथा-लेखनाचे बरेच कौतुक झाले. कित्येकांनी त्यांना अभिनंदनपर पत्रही लिहिले. यानंतर माट्यांनी "आपापले हितगुज" हे चरित्रात्मक पुस्तक लिहिले. व काही निबंधही लिहिले. "रसवंतीची जन्मकथा" नावाचा दोनशे पानाचा प्रबंधही लिहिला.

पुढील परिच्छेदात माझी उपयुक्तता, संमेलनाचा अध्यक्ष झालो। याची माहिती आली आहे.

सगळ्यात शेवटी "मतभेदाचे दुसरे पर्व" यात १९३० साली झालेल्या मीठ सत्याग्रहाच्या चळवळीबद्दल व महात्मा गांधींच्या प्रचार तंत्राबद्दल आपले मत मांडले आहे.

चोविसाव्या प्रकरणात "नवा अर्थवाद" या शीर्षकाखाली म. गांधींची राजकीय चळवळ, नवा मतवाद, कम्युनिस्ट पंथाची स्थापना, मुसलमान जोरावत चालले। पाकिस्तानचा घोष का झाला ? मुसलमानांची भयाकुल वृत्ति, पाकिस्तानची फाळणी, फाळणी अवश्य, लोकसंख्येची अदलाबदल हवी होती। या सगळ्या विषयांबद्दल गांधीजींचा दृष्टिकोन काय होता हे सांगून स्वत:ही ह्या विषयाबद्दल आपले कांही मत मांडले आहे. व नंतरच्या परिच्छेदात सगळी वैयक्तिक माहिती सांगितली आहे.

माट्यांनी गांधीजींच्या नेतृत्वाचा एवढा गुणगौरव केला हे खरे असले तरी म. गांधींचे अहिंसाव्रत व त्या व्रताचे तत्वज्ञान, बहुतेकांना पटले होते की नाही याबद्दल ते शंका व्यक्त करतात. ही शंका थोडी रास्तही वाटते. माटे म्हणतात,

"महात्मा गांधींच्या या नव्या राजकीय चळवळीत महाराष्ट्रांतील तेव्हांचे अनेक सुशिक्षित तरुण दाखल झाले. टिळक वारल्यापासून आक्रमक राजकारणाची चव तरुण लोकांना चाखावयास मिळाली नव्हती. महाराष्ट्रांतील या लोकांना महात्माजींचे अहिंसाव्रत व विशेषत: त्या व्रतासंबंधीचे त्यांचे तत्वज्ञान, बुध्दि व भावना या दृष्टीने कितीसे मानवले होते; याविषयी जबर शंका आहे. पण ज्यांचे पुढारीपण पत्करले. त्याच्या तत्वज्ञानांतील व्रतवैकल्येसुध्दा शिस्त म्हणून तरी सांभाळली पाहिजेत, असे नव्या पिढीतील लोकांनी ठरवून टाकले; आणि खुषीने मान्य केले पाहिजे की, या कामी ते चांगले काटेकोरपणे वागले. काही लोकांना महात्माजींचे हे तत्वज्ञान मूलत:च पटले होते. पण अशा लोकांची संख्या अगदी कमी. बाकीच्या लोकांनी युध्दकालीन शिस्त म्हणूनच ह्या तत्वाला सलामी दिली."४८

माटे यांना गांधीजींचे नेतृत्व प्रभावी वाटत असले तरी त्यांचे काही धोरण, कल्पना, तत्वज्ञान त्यांना पटलेले दिसत नाही. याची प्रचिती आत्मचरित्रांतील एक दोन प्रकरणे वाचताना येते. विशेषत: पाकिस्तानच्या फाळणीच्या वेळी म.गांधींनी स्वीकारलेले धोरण माट्यांना पटलेले नव्हते. माटे या संदर्भात म्हणतात;

"महात्माजींचे प्रचारतंत्र विलक्षण प्रभावी होते, आणि सरकारला हतबुध्द करण्याच्या कामी तर त्यांनी अप्रतिम कौशल्य दाखविले पण हे सारे करीत असतां महाराष्ट्रांत पुन्हा मतभेदाचे वारे उत्पन्न झाले; आणि याचे कारण महात्माजींच्या मनात असलेली मुसलमानांच्या संबंधीची अतीव सहानुभूती हे होय. मुसलमानांची शाश्वतची प्रकृती कोणची, हे महात्माजींना फक्त शेवटी शेवटी प्रत्ययाला आले; आणि त्या प्रकृतीचा चरका सध्याच्या राज्यकर्त्यांना अजूनही बसत आहे."४९

याबरोबरच माट्यांनी पाकिस्तानची निर्मिती करताना लोकसंख्येची अदलाबदल करावी असा महत्वाचा विचार सांगितला होता व असे म्हंटले होते, "आठशे वर्षे झाली, आपल्याला हे विष पचविता आले नाही. आणि एवढ्या प्रदीर्घ काळांतील हिंदु लोकांचा त्याग, त्यांची वीरवृत्ति, त्यांचे तत्वज्ञान या सर्वांचा विनियोग मुस्लीमांशी झगडण्यांत झालेला असून हा प्रश्न पुन्हा पहिल्या इतकाच प्रबळ राहिलेला आहे."[५०]

माट्यांनी जे मत व्यक्त केले ते काही जेष्ठ राजकीय नेत्यांनीही त्यावेळी मानले होते. खुद्द जिनांनी देखील "आधी लोकसंख्येची अदलाबदल झाली पाहिजे" असे प्रतिपादिलेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही असाच विचार व्यक्त केला होता. पण ह्या लोकांचे म्हणणे कोणी लक्षातच घेतले नाही. माटे यांची चिकित्साबुध्दी तीव्र आणि समस्येच्या मुळाशी भिडणारी होती हे यावरून स्पष्ट होते. ते स्वतंत्र बुध्दीने विचार करीत. कोणाच्या तरी प्रभावा-खाली येऊन त्यांनी आपले विचार बनविले असे; मात्र दिसत नाही. माटे कांहीसे हिंदुत्ववादी होते हे खरे आहे, पण हिंदु महासभा, रा.स्व.संघ [राष्ट्रीय सेवक संघ] अशा संस्थांशी त्यांचे सर्वस्वी पटत होते. असे मानता येत नाही. या संस्थांशी त्यांचे काही वेळा तीव्र मतभेद होते असेही आढळते. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विषयी त्यांना आदर होता व त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्याबद्दल त्यांना फार आगत्य वाटत होते पण तरीही सावरकरांच्या मतसरणीवर त्यांनी काही वेळा तीव्र टीका केली होती आणि त्याबद्दल सावरकर अनुयायांनी त्यांना मारण्याच्या धमक्याही दिल्या होत्या. जे पटेल ते स्वीकारायचे आणि जेथे पटत नाही ते न्यायनिष्ठुरपणे बाजूला सारायचे हा त्यांच्या स्वभावाचा विशेष होता.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

यानंतर "स्वत:चे मनोगत" या पुढील परिच्छेदात – पुण्यासच का राहिले ? निस्पृहतेची कमाल, पोरका झालो, तारू लागले बंदरी. गाइरी अनेक नमने इ. त मोठया भावाच्या संयमी वृत्तीबद्दल, स्वभावाबद्दल, आईच्या सोशिकपणाबद्दल तिच्या स्वार्थत्यागाबद्दल माहिती दिली आहे.

प्रकरण पंचविसावे "लोकांची विविध रूपे" यात काही देशभक्तांची ओळख करून दिली आहे. नंतर मराठा समाजातील स्थित्यंतर, समाजात पडत चाललेली जपणुकीची मतान्तरे, शिक्षित मनाचा गुजारा इ. चे चित्रण आले आहे.

या प्रकरणाच्या सुरुवातीस ज्यांनी आपले उभे आयुष्य देशकार्यासाठी घालविले अशा काही ध्येयवादी, स्वार्थत्यागी, कष्टाळू व्यक्तींची ओळख करून दिली आहे.

1] डॉ. मुंजे व डॉ. हेडगेवार – हिंदू समाज बलिष्ठ करण्यासाठी झटले.

2] मोरोपंत अभ्यंकर – यांनी आपले सगळे आयुष्य देशसेवेत घालविले. तेही दारिद्र्यात.

3] वीर सावरकर – विनायक दामोदर सावरकर – यांनी आपला उभा जन्म ध्येयनिष्ठेत, स्वातंत्र्यप्रेमात घालविला. त्यांची देशभक्ती सर्वश्रुतच आहे.

4] अण्णासाहेब भोपटकर – एक निस्सीम देशभक्त.

पुढे सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्यांची ओळख करून दिली आहे. यांत गोपाळराव देवधर, व डॉ. केतकर यांचा समावेश होतो. केतकरांबद्दल माटे लिहितात,

"या विद्वान माणसाच्या मनाचा व्याप फार मोठा होता; आणि कोणी कधी न धुंडाळलेली ज्ञानाची क्षेत्रे अभ्यासण्याच्या कामांत त्यांनी विलक्षण प्रतिभा दाखविली. केवळ बावन्न वर्षाच्या हयातीत त्यांनी लेखनाचे डोंगर रचले; आणि त्यांची हस्तलिखिते मोठाल्या ग्रंथाच्या रूपाने अजूनही अवतरत आहेत."[५१]

"शिक्षित मनाचा गुजारा" या परिच्छेदात त्याकाळी कुठल्या प्रकारचे व कुणाचे वाङ्मय वाचून लोकांच्या बुध्दीचा बनाव व मनोरंजन होत असे हे विस्ताराने सांगितले आहे. याबरोबरच कोणकोणत्या ग्रंथाच्या वाचनाचा परिणाम मागच्या व पुढच्या पिढीवर झाला याची कल्पना दिली आहे. यातील काही ग्रंथाची - ग्रंथकर्त्यांची नावे पाहू.

"सुदाम्याचे पोहे" - कोल्हटकरांची विनोदी लेखमाला, "संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन" ही केळकरांची लेखमाला, धुळ्याचे श्री. शंकरराव देव यांनी लिहिलेली दासबोधाची प्रस्तावना, खाडिलकरांनी लिहिलेले - "केसरीतील लेख", शिवरामपंतांचे "काळ" पत्रातील लिखाण, हरिभाऊंच्या कादंबऱ्या - "जग हे असे आहे", "मधली स्थिती", "उष:काल", भाटे यांची "प्रेम की लौकिक" ही कादंबरी, सावरकरांचे मॅझिनीचे चरित्र, राजवाडे यांचे इतिहास संशोधन, टिळकांचे गीता-रहस्य, कॉलेज जीवनात वाचलेली काही इंग्रजी व संस्कृत नाटके - उदा. शाकुंतल, वेणीसंहार, मालती माधव, ऋग्वेदातील वेचे, शेक्सपिअरची नाटके, वर्डस्वर्थ, बायरन, मिल्टन, शेली, कान्ट यांचे गदय-पदय लेखन. इ. ग्रंथकर्त्यांच्या साहित्याने तेव्हाच्या महाराष्ट्रातील सुशिक्षित समाजाच्या मनाची - बुध्दीची घडण होत गेली व होत राहिली.

प्रकरणाच्या शेवटी "अस्पृश्य समाज" या शीर्षकाखाली अस्पृश्य समाजाच्या चळवळीला डॉ. आंबेडकरां-सारखा महान नेता येऊन मिळाला व ही चळवळ अधिक व्यापक बनत गेली हे सांगितले आहे.

शेवटच्या प्रकरणांत त्यांची सगळी वैयक्तिक माहिती आली आहे. यात माट्यांच्या केसरीत प्रवेश, गाबुटलेला हिंदुत्वकोष - हिंदुत्वकोश अपुराच राहिल्यामुळे "गाबुटलेला" असे म्हटले आहे. यानंतर त्यांची मराठी साहित्य परिषदेतील कामगिरी, दिल्लीचे संमेलन, पत्नीसमवेतची हरिद्वारची यात्रा, विसरलेले काही वाद, यात आपल्या आयुष्यात कुणाकुणाशी आपल्या तत्वासाठी झगडावे लागले याचे चित्रण आले आहे. पुढे अत्रे माटे वाद, काव्य व्याख्येचा वाद, साठीचा समारंभ, म. गांधींचा वध, प्रभात मध्ये नेहरूंच्यावर लिहिलेल्या लेखामुळे अल्पकाळ तुरुंगवास, नंतर स्वत:च्या कुटुंबाची माहिती यात-सुखी प्रपंच, दिनचर्या, स्वत:चे गुणदोष, चरिताचा हिशेब इत्यादींची माहिती आली आहे.

माट्यांनी आपले आत्मचरित्र तटस्थ वृत्तीने लिहिलेले आहे. स्वत:च्या जीवनाकडे अलिप्तपणे पाहून आत्मचरित्र लिहिण्याचीकला माट्यांना साधली आहे. हे त्यांचे आत्मचरित्र वाचताना दिसून येते. त्यांच्या आत्मचरित्रात कुठेही आत्म समर्थनाची आत्म गौरवाची भूमिका आढळत नाही. आपल्या स्वभावातील गुण दोषही त्यांनी अत्यंत मोकळ्या मनाने सांगितलेले आहेत. त्याची काही उदाहरणे.

माटे शाळेत असताना एकदा कोणत्या तरी मास्तरांची पाठवणी करण्याच्या समारंभाच्या वेळी भाषण केले होते. या प्रसंगा बद्दल माट्यांनी स्वत:बद्दलच गौरवोद्गार काढले आहेत. ते म्हणतात, "माझे भाषण फार छान वठले; तेंव्हापासून मी सभेत सारखी भाषणे करीत आहे."[५२]

दुसरे उदाहरण म्हणजे शाळेत असताना त्यांनी नाटकात काम केले होते. त्यांच्या अभिनयाची तारीफही लोकांनी केली होती. माटे या प्रसंगाबद्दल म्हणतात. "मी माझे काम चांगले समजून केलेले होते. तेव्हा चांगला नट म्हणून साताऱ्च्या सर्व सुशिक्षित समाजांत माझी एकदमच ख्याति झाली."[५३]

यानंतर शाळेत मी हुषार विद्यार्थी होतो हे सांगितले आहे. पुढे एका ठिकाणी माटे म्हणतात, "बी.ए. च्या वर्गात गेल्यावर अलंकाराच्या उदाहरणांपैकी माझे एकही उदाहरण कधी चुकले नाही. असे असल्यावर आपल्याला गणित आणि सायन्स हे विषय येत नसले, तरी आपण पुढे चांगले ठरू असा खोल विश्वास माझा मला वाटत असे."[५४] अर्थात अशी उदाहरणे स्वत:वरच्या जबरदस्त आत्मविश्वासातूनच आली असल्याने यात थोडासा आत्म गौरव असला तरी ते सत्यास धरून असल्याने त्यास आत्म गौरवाचा दोष येत नाही.

पुढे स्वत:च्या विस्मृतीचा दोष सांगितला आहे. तसेच गणितातील कच्चेपणा-विषयीही सांगितले आहे. नंतर "गीता-रहस्या" बद्दल म्हणतात, "मला तेव्हा हा ग्रंथ नीट कळला नाही; कांही प्रकरणे कळली पण विषयाचा मूळ गाभा ध्यानांत आला नाही."[५५] वरील उदाहरणांवरून माट्यांच्या स्वभावाची कल्पना येते.

या स्वत:च्या गुण दोषा बद्दल सांगत असतानाच प्रत्येक प्रकरणांत इतरांच्या गुण दोषांबद्दल व एखादया प्रसंगाबद्दल आपले स्वत:चे काही चिकित्सक मतही मांडले आहे. उदा. शिक्षकांचे वर्गात पैगणे, ताई महाराज खटला, टिळक गोखल्यांचे वैर, सुरतेची कॉंग्रेस सभा, ख्रिस्ती मिशन-यांचे उद्योग, वेदोक्त पुराणोक्त प्रकरण,

गणपतीतले मेळे, सत्यशोधक समाजाची चळवळ, फुले-लोकहितवादी यांच्या कार्याची चिकित्सा, जहाल व मवाळ पक्षाचे मत, गांधीजींचे फाळणीविषयक मत, म. गांधीच्या राजकारणातील परिवर्तने, मुळशीचे धरण, अश्लिलता विरोधी चळवळ, पांगारकरांचा राज संन्यास, कुलीन स्त्रिया व नाटके इ.

परंतु त्यांच्या आत्मचरित्रातील प्रकरणांत खूपच विस्कळीतपणा आहे. रचनेच्या दृष्टीने, विषयाच्या दृष्टीने काही प्रकरणांत सुसूत्रता आढळत नाही. प्रकरणाचे शीर्षक वेगळे व आतल्या मजकुराची सुरूवात वेगळी असा प्रकारही यात बऱ्याच ठिकाणी झालेला आढळतो. या व्यतिरिक्त त्याचत्या व्यक्तींचा पुन्हा पुन्हा उल्लेख आलेला आहे. सलगपणे ज्या विषयांचे दर्शन घडावयास हवे तसे ते घडत नाही. यावरुन असे दिसून येते की, माट्यांनी आत्मचरित्र लिहिताना कोणतीही योजना आखली नव्हती.

आणखी एक गोष्ट सांगायची म्हणजे त्यांच्या आत्मचरित्रात एक दोन प्रकरणे वगळता जवळजवळ सगळ्या प्रकरणांत टिळकांच्या राजकारणाचे व त्यांच्या व्यक्तिमत्वाचेच चित्रण जास्त आले आहे. खरे तर माट्यांनी स्वत:चे आत्मचरित्र लिहिण्या ऐवजी टिळकांचेच चरित्र लिहावयास हवे होते असे वाटते.

वस्तुत: माट्यांचे आत्मचरित्र म्हणजे "मी व मला दिसलेले जग" ही एक दर महिन्याला "वसंत" मासिकात प्रसिध्द होणारी लेखमाला होती. हीच लेखमाला पुढे ग्रंथनिविष्ट झाली. ज्या ज्या वेळी ह्या घटना घडल्या त्या त्या घटना त्यांनी त्यांच्या जीवनक्रमानुसार प्रसंगानुसार लिहिल्या. व पुढे त्यात विशेष बदल न करता जशयाच्या तशा छापल्या गेल्या. त्यामुळे देखील त्यांच्या आत्मचरित्रात

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

अशी असंगती आली असेल. त्यांच्या दृष्टीने ही असंगती कदाचित योग्यही असेल. शिवाय त्यांना "स्व" चित्रणापेक्षा दिसलेल्या जगाचेच चित्रण अधिक करावयाचे असल्याने आत्मचरित्राच्या रचनेचा विचार त्यांनी केला नसावा. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे आत्मचरित्र छापून पूर्ण व्हायच्या दरम्यान माटे अंथरूणाला खिळून होते. काही किरकोळ गोष्टी वगळता "दिसलेल्या जगाच्या" चित्रणाच्या दृष्टीने माट्यांचे आत्मचरित्र उत्तम उतरले आहे यात शंका नाही.

00 *÷*÷*÷*÷* 00

## ** संदर्भ सूची **

१] माटे श्री.म. : "चित्रपट, मी व मला दिसलेले जग" व्हीनस प्रकाशन, पुणे-२, पृष्ठ-२२५

२] शिरवाडकर वि.वा. : अध्यक्षीय भाषण, मुंबई उपनगर म.सा. संमेलन अधिवेशन चौदावे १९५६, बीणा मे १९६४, पृष्ठ-३१.

३] माटे श्रुति : पृष्ठ-६,७.

४] तत्रैव, पृष्ठ-९

५] तत्रैव, पृष्ठ-११

६] तत्रैव, पृष्ठ-१४

७] तत्रैव, पृष्ठ-२०

८] तत्रैव, पृष्ठ-६

९] तत्रैव, पृष्ठ-६

१०] तत्रैव, पृष्ठ-२६

११] तत्रैव, पृष्ठ-२९

१२] तत्रैव, पृष्ठ-२९

१३] तत्रैव, पृष्ठ-३४,३५

१४] तत्रैव, पृष्ठ-४१,४२

१५] तत्रैव, पृष्ठ-४७

१६] तत्रैव, पृष्ठ-५९

१७] तत्रैव, पृष्ठ-७२

१८] तत्रैव, पृष्ठ-७३

१९] तत्रैव, पृष्ठ-७३,७४

२०] तत्रैव, पृष्ठ-७९

२१] तत्रैव, पृष्ठ-७७

२२] तत्रैव, पृष्ठ-७८

२३] तत्रैव, पृष्ठ-८१,८२

२४] तत्रैव, पृष्ठ-८८

२५] तत्रैव, पृष्ठ-९०

२६] तत्रैव, पृष्ठ-९६,९७

२७] तत्रैव, पृष्ठ-१०३

२८] तत्रैव, पृष्ठ-१०४

२९] तत्रैव, पृष्ठ-१११, ११२

३०] तत्रैव, पृष्ठ-१३३, १३४

३१] तत्रैव, पृष्ठ-२१३

३२] तत्रैव, पृष्ठ-१४५

३३] तत्रैव, पृष्ठ-१५४

३४] तत्रैव, पृष्ठ-१५४

३५] तत्रैव, पृष्ठ-१५७

३६] तत्रैव, पृष्ठ-१६०

३७] तत्रैव, पृष्ठ-२१५

३८] तत्रैव, पृष्ठ-२१६

३९] तत्रैव, पृष्ठ-२१८

४०] तत्रैव, पृष्ठ-२१९

४१] तत्रैव, पृष्ठ-२२४

४२] तत्रैव, पृष्ठ-२३२, २३३

४३] तत्रैव, पृष्ठ-३६०, ३६१

४४] तत्रैव, पृष्ठ-३८५

४५] तत्रैव, पृष्ठ-३८७

४६] तत्रैव, पृष्ठ-३८७

४७] तत्रैव, पृष्ठ-३९२, ३९३

४८] तत्रैव, पृष्ठ-३९५

४९] तत्रैव, पृष्ठ-३९३, ३९४.

५०] तत्रैव, पृष्ठ-४०२

५१] तत्रैव, पृष्ठ-४१२

५२] तत्रैव, पृष्ठ-२७

५३] तत्रैव, पृष्ठ-८८

५४] तत्रैव, पृष्ठ-१५०

५५] तत्रैव, पृष्ठ-२१३

00 *÷*÷*÷*÷* 00